काबरा एक्सप्रेस
डेली A.C बस / अर्जंट पार्सल सर्व्हिस • फुल लोड / पार्ट लोड सर्व्हिस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. १८.१२.२०२४ | अंक नं. २४३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

## दुचाकीवरून पाठलाग करत नगरच्या व्यापाऱ्याला जीवे मारण्याची धमकी

**मोबाईलवर पाठवला 'चंद रुपयो के लिये तुम अपनी जान दाव पर मत लगाव' चा मेसेज**

नगर - शहरातील व्यापाऱ्याचा दुचाकीवरून पाठलाग करत 'भाई का फोन आयेगा, उठा ले', असे म्हणत, तसेच मोबाईलवर 'चंद रुपयो के लिये तुम अपनी जान दाव पर नही लगाओगे', असा मेसेज पाठवत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी व्यापारी किरण मोहनलाल रांका (वय ५६, रा. अलायम बंगला, आदर्श कॉलनी, नगर) यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांका यांचे जुना दाणे डबरा येथे दर्शन सेल्स नावाने बेकरी प्रॉडक्टच्या रॉ मटेरियल विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे सहा कामगार आहेत. १४ डिसेंबर रोजी रात्री पावणेनऊ वाजता दुकान बंद करुन सर्जेपुरा चौक, अप्पू हत्ती चौक मार्गे घरी जात असतांना अप्पू हत्ती चौकाजवळ त्यांच्या दुचाकीचा दोघांनी पाठलाग करून त्यांना आवाज देऊन रस्त्यात थांबवले. दुचाकीवरील एकाने भाई का फोन आयेगा उठालो, असे म्हणत दोघे तेथून निघून गेले. त्यांच्या हातात नळकांडी सारखे काहीतरी होते.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी १५ डिसेंबर रोजी दुपारी त्यांच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेज आला. 'देख कल गोली नही चलाई, अगली बार सिधे ठोक देंगे, इसे महज एक धमकी समझके हमे हलके मे लेगा, हमसे गुस्ताखी करेगा तो यकीनन जान से जाएगा, हमारे बंदो को अंदर करेगा, तो तुझे छोड देंगे क्या? वो तो आजकल मे बाहर होंगे, लेकीन तुझें जहाँनुम पहुचाकर ही रहेंगे, कब तक छुपेगा, कहा तक भागेगा, पुलिस भी आखिर कब तक तुझको बचा लेगी? कही भी, कभी भी जहा मिला वही तेरी कबर खोद देगे, इस गलतफैमी मे बिलकुल भी मत रहना के पुलिस या कोई पॉलिटिशियन तुमको बचा लेगा, क्युंकी सब देखते रह जाएंगे और हमारी गोली तेरे अंदर होगी, हमे गोली चलाने पर मजबूर मत कर, वरना खून के आसू रोएगा ये हमारा वादा है, तेरे लिये बेहतर होगा के तू बिना किसी खून खराबे के हमारी बात मान और अपनी जान बचा,

ये मोबाईल और सिम फर्जी है और आगे भी जो कूछ मिलेगा वो भी फर्जी होगा, इस लिये हम उम्मीद करते है के चंद रुपयो के लिये तुम अपनी जान दाव पर नहीं लगाओगे', असा मेसेज आला. त्यानंतर त्याच मोबाईल नंबरवरुन फोन आला व त्यावर बोलणारा इसम 'मेसेज पढा क्या, भाई का फोन आयेगा उठाव', असे म्हणाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या संदर्भात पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांना विचारले असता, तपास सुरू असून सीडीआर आल्यावर पुढील तपासाला दिशा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

## परभणी घटनेच्या निषेधार्थ भिंगारमध्ये कडकडीत बंद


परभणी शहरामध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची एका अज्ञात समाज कंटकाने तोडफोड करून विटंबना केल्याच्या निषेधार्थ तसेच भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या संशयस्पद मृत्यूच्या निषेधार्थ भिंगार शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

नगर - परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना केल्याच्या निषेधार्थ तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या संशयास्पद मृत्यूच्या निषेधार्थ बुधवारी (दि. १८) आरपीआयसह सर्व पक्षीयांच्यावतीने भिंगारमध्ये बंदची हाक देण्यात आली होती. या आवाहनास व्यापारी असोसिएशन व नागरिकांनी प्रतिसाद देत शहरात दोन तासाहून अधिक काळ कडकडीत बंद पाळला.

यावेळी आरपीआयचे संभाजी भिंगारदिवे यांच्या नेतृत्वाखाली सिद्धार्थ आढाव, सुहास धिवर, प्रदीप भिंगारदिवे, अशोक भोसले यांच्यासह भीमसैनिकांनी शहरातील बाजारपेठेत फिरून व्यापारी दुकानदारांना बंदचे आवाहन केले. या आवाहनास प्रतिसाद देत व्यापारी, दुकानदार, नागरिकांनी आपली दुकाने तसेच दैनंदिन कामकाज दोन तास बंद ठेवले. तत्पूर्वी भिंगार कॅम्प पोलिस आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. हा बंद शांततेत पार पडला. बंदच्या काळात कोणतीही अनुचित घटना घडली नाही. या बंदमुळे शहरासह बाजारपेठेतील रस्त्यांवर पूर्णतः शुकशुकाट पसरला होता.



महापालिकेच्या प्रभाग समिती ४ च्यावतीने चाणक्य चौकामधील फळ विक्रेते ज्यूस हातगाड्या भाजीवाले, स्टॉल शेड तसेच चाणक्य चौकातील सार्वजनिक शौचालय, आयटीआय भिंती लगत असणारी अतिक्रमणे, चिकन शॉप, सलून व इतर २०/२५ टपऱ्या जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आल्या. या कारवाईत प्रभाग अधिकारी अनिल बाबर, क्षेत्रीय अधिकारी अमोल कोतकर व अनिल आढाव मुख्यालय क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख आदी सहभागी झाले होते. (छाया - बबलू शेख)

SONI TILES
Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

खाऱ्या पाण्याला बनवा वापरण्यायोग्य
खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय..
इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
मे. अभय सेल्स (कॉर्पोरेशन हार्डवेअर)
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

## चास घाटात मालट्रकच्या धडकेत, एक ठार, चार जण गंभीर जखमी


अमोल देवधर (मयत)

नगर - नगर - पुणे रोडने भरधाव वेगात जाणाऱ्या मालट्रकने पुढे चाललेल्या चारचाकी वाहनास पाठीमागून कट मारल्याने चार चाकी वाहन पलटी झाले. या अपघातात एक जण ठार झाला असून अन्य चौघे गंभीर जखमी झाले. ही घटना १७ डिसेंबरला रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास चास घाट येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की, नगर- पुणे रोडने भरधाव वेगात जाणाऱ्या मालट्रकवरील (क्रमांक एमएच १७ ए झेड ५२ ७४) चालकाने पुढे चाललेल्या चारचाकी वाहनास पाठीमागून कट मारल्याने चारचाकी वाहन पलटी झाले. या अपघातात अमोल यशवंत देवधर यांचा मृत्यू झाला तर गाडीतील सुमित नारायण राडीकर, योगेश जोशी, रुई राडीकर, मृण्मयी देवधर (सर्व रा. छत्रपती संभाजीनगर) हे गंभीर जखमी झाले. अपघात होताच ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनास्थळाजवळील नागरिकांनी जखमींना तातडीने उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले.

याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी सुमित दत्तात्रय राडीकर (वय ४१, रा. शिवाजीनगर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६ (१) २८१, १२५ (अ) (ब) ३२४ (४) मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४, (अ) (ब) १७७ अन्वये अपघाताच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार रेपाळे या करीत आहे.

अपघातात मयत झालेले अमोल देवधर (वय ४०) हे श्रीरामपूर येथील साई सोलरचे मालक व साई सेवक परिवार ग्रुपचे प्रमुख आहेत. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, दोन बहिणी, चुलते असा परिवार आहे. श्रीरामपूर नगरपरिषदेचे सेवानिवृत्त क्लार्क यशवंतराव बळवंतराव यांचे ते चिरंजीव तर अनंतराव व वसंतराव देवधर यांचे पुतणे होत.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 05 डिसेंबर ते 12 डिसेंबर 2024
PUSHPA 2
THE RULE (HINDI)

| | |
|---|---|
| 07:00 AM | 07:30 AM |
| 08:00 AM | 10:45 AM |
| 11:15 AM | 11:45 AM |
| 02:25 PM | 03:00 PM |
| 03:30 PM | 06:05 PM |
| 06:40 PM | 07:10 PM |
| 09:45 PM | 10:15 PM |
| 10:45 PM | |

-For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

५७ वे पुण्यस्मरण ११ वे पुण्यस्मरण
स्व. शंकरराव बापुराव काळे
स्व. दि. २७/१२/१९६८
स्व. कौशल्याबाई शंकरराव काळे
स्व. दि. १८/१२/२०१४
॥ आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली ॥
चंद्रकांत शंकरराव काळे (पटेल) | शशीकांत शंकरराव काळे
महेश चंद्रकांत काळे | मयुर शशीकांत काळे
स्वराज, शिवेंद्र, रिचा व काळे परिवार..
आई - वडीलांच्या पुण्याईने ७४ व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.
विश्राम हॉटेल
गंजबाजार, महादेव मंदिरा समोर, अ. नगर.

आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
हॅंडलूमवर आकर्षक 20% छूट
लग्न व सर्व सणासुदीसाठी लागणारे कपडे व इतर वस्तूंचे भव्य दालन..
खास आकर्षण
लखनवी चिकन सुट • सहारनपुर फर्नीचर
राजस्थानी बांगड्या • राजस्थानी पेंटिंग्स्
बनारसी साड्या • पश्चिम बंगला साड्या
चंदेरी सिल्क साड्या • बेड कव्हर्स
दिवान सेट • केरळ ज्वेलरी • सतरंजी
मोजडी • फॅन्सी चप्पल • लेदर बॅग्स् • टॉप्स
टी-शर्टस् • कारपेट • पंजाबी सुट
मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स • जयपुरी जूती
ब्लॉक प्रिंट • खुर्जा क्रॉकरी • टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – घरातील छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेऊन तरूणाने आत्महत्या केली. प्रदीप राजू हिरे (वय ३५, मुळ रा. मुळगाव शिंधी, ता. कोडगाव, जि. जळगाव, हल्ली रा. सोलापूर रस्ता, चर्च मागे, यशवंत कॉलनी, अहिल्यानगर) असे मयत तरूणाचे नाव आहे. प्रदीप हिरे यांनी सोमवारी (दि.१६) रात्री पावणे नऊच्या सुमारास यशवंत कॉलनीतील घरात छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. याची माहिती मिळताच त्यांना रूग्णवाहिकेतून उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉ. अक्षय ढगे यांनी त्यांची तपासणी केली असता ते उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषीत केले. तशी माहिती त्यांनी पोलिसांना दिली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार एम. टी. विधाते करत आहेत.

## औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यू

नगर – औषध उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या लक्ष्मण कुटे या इसमाचा औषध उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर खेडकर यांनी दिलेल्या माहितीवरून नगर तालुका पोलिसांनी लक्ष्मण दशरथ कुटे (वय ४० रा. चिचोंडी पाटील, ता. नगर) याच्या मृत्यू प्रकरणी बी एन एस एस २०२३ चे कलम १९४ प्रमाणे आकस्मात मृत्यूची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार भवर करीत आहे.

## गुरुकुल भागवताश्रमाचे हभप अशोकानंद महाराज कर्डिले यांचे निधन

नगर – बुऱ्हाणनगर येथील रहिवासी गुरुवर्य हभप भागवताचार्य



अशोकानंद महाराज कर्डिले (वय ७२, रा.गुरुकुल भागवताश्रम, चिचोंडी पाटील) यांचे १७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी गुरुकुल भागवताश्रम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## लिलाबाई मुनोत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – भानसहिवरा येथील रहिवासी लिलाबाई चंपालाल




मुनोत (वय ८५) यांचे १७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भानसहिवरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत, संजय, मनोज यांच्या त्या मातोश्री होत.

## सुभाषलाल लोढा यांचे संथारा व्रतात निधन


नगर – सारसनगर वर्धमान कॉलनी येथील रहिवासी सुभाषलाल



नारायणदास लोढा (पुंडीवाला) यांचे १८ डिसेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. १५ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता महासती विधीदर्शनाजी म.सा. यांच्याकडून लोढा यांनी संथारा व्रत धारण केले होते. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी राजलबाई लोढा, २ मुले मनोज व निलेश लोढा, २ विवाहित बहिणी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या जैन धर्म परंपरेनुसार बुधवारी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

## भाऊसाहेब कुटे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – येथील रहिवासी श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा केंद्र,



संगमनेरचे अध्यक्ष भाऊसाहेब गंगाधर कुटे (वय ६५, रा.सुकेवाडी, शिवाजीनगर, ता.संगमनेर) यांचे १७ डिसेंबरला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर सुकेवाडी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सूर्यकांत शिंदे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सारसनगर येथील रहिवासी सूर्यकांत पंढरीनाथ



शिंदे (वय ७०) यांचे १८ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातू असा परिवार आहे. श्री. बन्सीभाऊ म्हस्के माध्यमिक विद्यालय टाकळी काझी ता. नगर येथे ते शिक्षक म्हणून होते.

## सुमित देशपांडे यांचे हृदयविकाराने निधन

सिडको – महानगर १ येथील रहिवासी व ए एस आर कंपनी



इंजिनियर या पदावर कार्यरत असलेले सुमित दुर्गादासराव देशपांडे (वय ३४) यांचे कर्तव्यावर असताना हृदयविकाराने १६ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रेरणा सुमित देशपांडे, एक मुलगी, एक बंधू सोहन दुर्गादासराव देशपांडे व वडील असा परिवार आहे.

## महान शो मॅनचा शताब्दी जन्मोत्सव

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

परवा कपूर घराणे पंतप्रधानांना भेटायला गेले. निमित्त होते 'दि ग्रेटेस्ट शोमॅन ऑफ इंडियन सिनेमा' राजकपूर यांच्या वर्षभर साजरे झालेल्या शताब्दी जन्मोत्सवाचे.

मन ६-७ शतके मागे गेले. आठवले १९३५ ला वडिलांच्या स्टुडिओत अक्षरशः झाडझुडच्या कामाने कारकिर्दीची सुरुवात करणारा गोरागोमटा सुकुमार. राजकपूर हा हिंदी चित्रपटाच्या सुवर्ण काळातील एक सर्वोत्तम, भावनाशील व महत्त्वाचा व्यक्ती होता. अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक म्हणून आजही लक्षणीय असलेल्या राजजींना संगीताचा विशेष कान होता. भोळाभाबडा, वेंधळा, स्वप्नाळू असा चार्ली चॅप्लीनच्या वळणाच्या या वल्लीने चित्रपट इतिहासात स्वतःचे सुवर्णपान उमटवून ठेवले आहे.

१९४८ च्या आग चित्रपटाच्या यशापासून १९८५ च्या 'राम तेरी गंगा मैली' पर्यंतचा त्यांचा चित्रपट प्रवास थक्क करणाराच आहे. 'राज स्टुडिओ' हा भारतीच चित्रपट सृष्टीच्या मैलाचा दगडच होता. दुर्दैवाने कपूर घराण्याला तो बंद करून विकावा लागला. राजजी अत्यंत भावनाशील व मनस्वी होते असे मला नेहमीच वाटत आलंय. कदाचित जिथे जिथे प्रेम पाहिले तिथे तिथे त्यांना ते मिळाले नसावे!

त्यांच्या प्रत्येक रोमॅन्टीक चित्रपटात विरहाची झालरही जाणवते. 'मेरा नाम जोकर' हा त्याचाच परिपाक! राजजींनी चित्रपट सृष्टीसह प्रेक्षकांना भरभरून दिले. त्यांच्याच गाण्याप्रमाणे 'कल खेलमें हम हो ना हो' किंवा 'सजन रे झूट मत बोलो...' किंवा 'गीत हमारे प्यार के दोहरायेंगी जवानीयाँ...''




# परभणीच्या घटनेतील युवकाच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल करा अन्यथा २३ डिसेंबर रोजी आत्मदहन करणार

## भीम सैनिकांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी रिपाईची निदर्शने

नगर – परभणी मध्ये झालेल्या संविधानाच्या विटंबनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (गवई) वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निषेध नोंदवून भीम सैनिकांवरील गुन्हे त्वरित मागे घ्यावे, कोंबिंग ऑपरेशन थांबवावे व सोमनाथ सूर्यवंशी मारहाण प्रकरणी त्या पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपाईच्या वतीने करण्यात आली. सदर प्रकरणी कारवाई न झाल्यास रिपाईच्या सर्व आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी २३ डिसेंबर रोजी सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

मंगळवारी (दि.१७ डिसेंबर) जिल्हाधिकारी कार्यालया समोर झालेल्या निषेध आंदोलनात रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, विजय शिरसाठ, संदीप वाघचौरे, लखन सरोदे, देवेंद्र वाघमारे, विशाल भिंगारदिवे, विनीत पाडळे, प्रतीक शिंदे, अजय बडोदे, रोहन थोरात, प्रणव गायकवाड, दीपक गायकवाड, गुलाम शेख, नईम शेख, अजीम खान, जमीर सय्यद, तुषार गायकवाड, उमेश गायकवाड, संतोष पाडळे, मुकेश ठसाळ, ज्योती पवार, पूजा साठे, संपदा म्हस्के, हुसेन चौधरी, आदिल शेख, सचिन शिंदे, मनीषा गायकवाड, सुधीर गायकवाड, जयश्री गायकवाड, सारिका साळवे, ज्योती साठे, सारिका गांगुर्डे, कावेरी भिंगारदिवे, पप्पू पाटील आदींसह रिपाईच्या सर्व आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



परभणीच्या घटनेतील मारहाणीत युवकाच्या मृत्यप्रकरणी पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना भिमसैनिकत.

परभणीत नुकतेच एका समाजकंटकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करुन विटंबना केली. त्यामुळे भीमसैनिकांनी परभणीत आंदोलन केले. त्यावेळी भीमसैनिकांवर वेगवेगळे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी पोलीस प्रशासनाने अमानुष लाठीचार्ज केला. मागासवर्गीय वस्तीमध्ये वाहनांची तोडफोड काही पोलीस कर्मचाऱ्यांनी केली. अनेक आंदोलकांना अटक केली. पोलीस कस्टडीमध्ये ठेवून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. मानवतेला काळीमा फासेल, अशा पध्दतीने भीमसैनिकांना मारहाण करण्यात आली. पोलीसांनी केलेल्या या मारहाणीमध्ये सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा मृत्यू झाल्याचा आरोप रिपाईच्या वतीने करण्यात आला आहे.

सदर युवकाचा मृत्यू नसून, त्याची हत्या झाली आहे. एवढ्यावरच पोलीस प्रशासन थांबले नसून, त्यांनी कोंबिंग ऑपरेशन चालू केले आहे. त्यामध्ये अनेक निष्पाप युवकांना अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सर्व मागासवर्गीय असल्याने अन्याय, अत्याचार सुरु असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर हत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, परभणीमधील सर्वच भीमसैनिकांवरील गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावे, त्या ठिकाणी सुरू असलेले कोंबिग ऑपरेशन त्वरित थांबवावे, संविधानाची विटंबना करणाऱ्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपाईच्यावतीने करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभापती पदाच्या निवडणुकीसाठी प्रा. राम शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, उदय सामंत, जयकुमार रावल उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढतच असून अशीच आणखी एक घटना नगर तालुक्यातील जेऊर गावात १४ डिसेंबरला घडली आहे. या गावात बहिणीकडे आलेल्या एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले आहे.

याबाबत सदर मुलीच्या मेव्हण्याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सदर मुलगी राहुरी तालुक्यातील असून ती आपल्या बहिणीकडे आली होती. १४ डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास ती घरातून बेपत्ता झाली. बराच वेळ झाला तरी मुलगी घरी न आल्याने तिच्या नातेवाईकांनी आजुबाजुच्या परीसरात शोध घेतला असता काहीही माहिती भेटली नसुन ती कोठेही मिळुन आली नाही. त्यामुळे सदर मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर मुलीच्या मेव्हण्याने सोमवारी (दि.१६) सायंकाळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


# थकबाकीपोटी महापालिकेकडून दोन मालमत्ता सील

## कारवाईला सुरुवात; थकबाकीदारांनी कराचा भरणा करावा : आयुक्त यशवंत डांगे

नगर – मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकबाकी वसुलीसाठी महापालिकेने आक्रमक कारवाईला सुरुवात केली आहे. मंगळवारी दिवसभरात महानगरपालिकेच्या सावेडी प्रभाग कार्यालयाने नगर – मनमाड रस्त्यावरील व बालिकाश्रम रस्त्यावरील मालमत्ता थकबाकीपोटी सील केली आहे. शहरातील मालमत्ताधारकांनी त्यांच्याकडील थकीत कराचा भरणा करून जप्तीसारखी कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

उपायुक्त प्रियंका शिंदे यांच्या उपस्थितीत सावेडी प्रभाग अधिकारी बबनराव काळे, कर संकलन अधिकारी विनायकराव जोशी, कर निरीक्षक ऋषिकेश लखापती तसेच वसुली लिपिक संजय तायडे, संदीप कोलते, राजेश आनंद, सागर जाधव, किशोर देठे, शंकर अवघडे, गोरक्ष ठुबे यांच्या पथकाने मार्क स्केअर अपार्टमेंट येथील तिसरा मजल्यावरील झेड के बॉलीवूड कॅफे ४ लाख २ हजार ७६२ रुपयांच्या थकबाकीपोटी सील करण्यात आले आहे. भिंगारदिवे मळा, बालिकाश्रम रोड येथील मालमत्ताधारक भागवत यांचा गणपतीचा कारखाना २ लाख ३० हजार १९७ रुपयांच्या थकबाकीपोटी सील करण्यात आला आहे.





थकबाकीपोटी शहरातील दोन मालमत्ता सील करताना महापालिकेचे पथक.

सिव्हिल हडको येथील मालमत्ताधारकाकडे असलेल्या मालमत्ता कराच्या २ लाख ५१ हजार ८७९ रुपयांच्या थकबाकीपोटी महापालिकेच्या पथकाने कारवाई सुरू करताच त्यांनी आठवड्याभरात संपूर्ण रक्कम भरण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे त्यांच्यावरील कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. तसेच मालमत्ताधारकाची संभाजीनगर रोडवरील हॉटेलची मालमत्ता कराची थकबाकी १ लाख ४३ हजार ४७२ रुपये असल्याने त्यांच्यावरही कारवाई प्रस्तावित करण्यात आली. त्यांनीही आठवडाभरात संपूर्ण रक्कम भरण्याची तयारी दर्शवल्याने त्यांच्यावरील कारवाई स्थगित करण्यात आली. ज्या मालमत्ताधारकाकडे मालमत्ता कराची थकबाकी असेल, त्यांनी स्वतः येऊन मनपात जमा करावी, अन्यथा कारवाईला समोर जावे लागेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# मनपा अतिक्रमण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात आयआय लाईन बाजार येथील नागरिकांची आयुक्तांकडे तक्रार

## कारवाईपूर्वी कायदेशीर नोटीसीने कळविण्याची मागणी

नगर – औरंगाबाद रोडवरील (जुना हॅरिस रस्ता), अहिल्यानगर येथील आयआय लाईन बाजार परिसरात विना नोटीस विना परवानगी महापालिकेच्या अतिक्रमणाच्या नावाखाली बेकायदेशीर कारवाई करण्यात येत असल्यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना अजय मकासरे, नदीम जहागिरदार, शेख तन्वीर चांद, जमाल शेख, सय्यद वाहीद अब्दुल हमीद, पन्नालाल कटारिया, आरिफ अहमद शेख, नवेद शेख अल्ताफ, शेख सादिक अहमद, एस. डी. पटेल आदींनी निवेदन दिले. निवेदन स्वीकारल्यानंतर आयुक्त यशवंत डांगे यांनी जागांच्या कागदपत्रांची तपासणी करून त्यानंतर कारवाई करू, असे आश्वासन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई सुरू असून, आम्ही सर्व रहिवासी वरील परिसरात वास्तव्यास असून, मोठ्या प्रमाणात येथे नागरी वस्ती आहे. येथील मालमत्ता आमच्या कायदेशीर मालमत्ता आहेत. मागील काही दिवसांपासून मनपा अधिकारी व कर्मचारी दर दोन दिवसाआड विना परवानगी विना नोटीस आमच्या मालकी हक्काच्या जागेत येतात व मोजमाप करून वेगवेगळ्या ठिकाणी खुणा लावत आहेत. आमच्या स्व-अर्जित मालकी हक्काची जागा अतिक्रमणाच्या नावाखाली जमीनदोस्त करण्याच्या धमक्या देऊन जात आहेत.



औरंगाबाद रोडवरील (जुना हॅरिस रस्ता), अहिल्यानगर येथील आयआय लाईन बाजार परिसरात विना नोटीस विना परवानगी महापालिकेच्या अतिक्रमणाच्या नावाखाली बेकायदेशीर कारवाई करण्यात येत असल्यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना अजय मकासरे, नदीम जहागिरदार, शेख तन्वीर चांद, जमाल शेख, सय्यद वाहीद अब्दुल हमीद, पन्नालाल कटारिया,आरिफ अहमद शेख, नवेद शेख अल्ताफ, शेख सादिक अहमद, एस. डी. पटेल आदींनी निवेदन दिले. (छाया – बबलू शेख)

आम्ही कोणीही अतिक्रमण केले नसून, अतिक्रमण आढळल्यास ते काढण्यासाठी आम्ही सहकार्य करू. सर्वांना राहण्यासाठी घर मिळावे, असे प्रशासनाचे धोरण असताना आमच्यासारख्या सामान्य गरीब कुटुंबातील नागरिकांना मनपा अधिकारी बेघर करण्याच्या बेतात आहेत. हे अधिकारी आम्हाला बेघर करण्याच्या धमक्या देत आहेत.

मागील काही कालावधीपासून आमच्यासारख्या गरीब दुर्बल लोकांच्या हाताला काम नाही. अशा परिस्थितीत उपासमारीची वेळ आलेली आहे. मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आम्हाला बेघर केल्यास प्रशासनासमोर सामुदायिक आत्मदहन करावे लागेल, अशा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तरी याची तातडीने दखल घेऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना समज द्यावी. जेणेकरून स्व-अर्जित मालकीच्या रहिवासी जागेत राहण्याचा अधिकार हिरावून घेऊ नये. कायदेशीर कारवाई पूर्वी आम्हा रहिवाशांना कायदेशीर नोटीसीने कळवावे, असेही निवेदनात म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### तुप लावा द्या पायांना आराम

तुपामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे पायांची सूज आणि वेदना कमी होते. तुपात व्हिटॅमिन ई असते, ज्यामुळे पायांच्या नसा मजबूत होतात. पायाला तूप लावल्याने मनात वाईट विचार येण्यापासून प्रतिबंध होतो, त्याच प्रमाणे मनाला आराम मिळतो. कारण ते पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते.

## पाककला

### मेथीचे कटलेट

**साहित्य :** बारीक चिरलेली मेथी, आले-लसूण पेस्ट, बटाटे उकडलेले, मसाले, ब्रेडचे तुकडे, कॉर्न फ्लोअर

**कृती :** सर्वात आधी एका कढईत थोडे तेल गरम करून त्यामध्ये जिरे घालावे. तसेच आता त्यामध्ये आले-लसूण पेस्ट आणि हिरवी मिरची घालून परतवून घ्यावे. आता मेथी घालून परतवून झाकण ठेवावे व वाफ येऊ द्यावी. आता त्यामध्ये मॅश केलेले बटाटे घालावे. तसेच चिरलेले काजू, जिरे, धणे, हळद, मीठ आणि गरम मसाला घालून मिक्स करावे व परतवून घ्यावे. मिश्रण पाण्याने ओले वाटत असेल तर अधिक ब्रेड क्रम्ब्स किंवा एक चमचा बेसन घालावे. गॅस बंद करून हे मिश्रण थोडे थंड होऊ द्यावे. एका प्लेटमध्ये ब्रेडक्रंब ठेवा आणि कॉर्न फ्लोअरचे द्रावण देखील तयार करून घ्यावे. तसेच थोडेसे मिश्रण हातात घेऊन त्याचा गोळा बनवावा. हा गोळा कॉर्न फ्लोअरच्या द्रावणात बुडवून घ्या आणि नंतर ब्रेडक्रंबमध्ये गुंडाळा. त्याच पद्धतीने सर्व कटलेटस् बनवा व तव्यावर हलकेसे फ्राय करा.

## वास्तू

### अशी भांडी असावीत

पितळेची भांडी घरातील वास्तू दोष दूर करतात. हा दृष्टिकोन लक्षात घेऊन या भांड्यांचे नक्षीकाम केले जाते. याशिवाय त्यांच्या आकाराकडे विशेष लक्ष दिले जाते. ही भांडी इतकी शुभ आहेत की लोक त्यांना गहू आणि तांदूळ भरतात आणि त्यांच्या घरात ठेवतात. यामुळे घरामध्ये धन-धान्य आणि लक्ष्मीचा आशीर्वाद राहतो.

## सल्ला

डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.

## सौंदर्य

आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा. एकाच रंगाचे वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १९ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, आश्लेषा २६।००, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०६ वा. १५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. आरोग्य उत्तम राहील. शत्रूंवर प्रभाव वाढेल.

**वृषभ :** एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. मागील उधारी वसुल होईल.

**मिथुन :** इतरांना सहकार्य केल्याने वाद कमी होतील. महत्त्वाची जबाबदारी मिळेल. खर्च वाढेल.

**कर्क :** स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. इतर लोकांना तुमचे विचार पटतील.

**सिंह :** एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल.

**कन्या :** आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. व्यस्त राहाल. यंत्रे व वाहने खराब होण्याची संभावना

**तूळ :** अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. स्त्री पक्षाचा आधार राहील.

**वृश्चिक :** उत्साहजनक वार्ता मिळतील. लेखन कार्यात प्रगती होईल. व्यस्त राहाल. जुने मित्र भेटतील.

**धनु :** देवाण-घेवाण काळजीपूर्वक न केल्याने नुकसान. अत्यंत व्यस्त राहाल. दिवस खास जाणार नाही.

**मकर :** वाहने काळजीपूर्वक चालवा. हितशत्रू डोके वर काढतील. मित्रांच्या सहयोगाने कार्यांमध्ये सहजपणा राहील.

**कुंभ :** मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळाल.

**मीन :** जुने शिक्षक भेटतील. आपली सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज गंभीर विचार करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**पहिला मुलगा :** माझे बाबा एवढे उंच आहेत कि हात वर करून छताला लावतात
**दुसरा मुलगा :** माझे बाबा तर एवढे उंच आहेत कि हात वर करून विमानाला लावतात
**तिसरा मुलगा :** माझे बाबा पण खूप उंच आहेत पण ते असले चाळे करत नाहीत..


# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* पिटकॉर्न बेटे कोणी शोधून काढली? - ब्रिटीश बंडखोर
* ओगस्वरा बेटे कधी उदयास आली? - ४८ लाख वर्षांपूर्वी
* अताफू बेटे कोणी शोधून काढली? - जॉन बेरन

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०७४

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०७३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) अगणित; असंख्य; अनंत ४) ओळख ७) मनधरणी; आर्जव; विनंती ९) एक प्रकारची दारू १०) दरवाजा; द्वार; कवाड १२) गाईचे दूध १३) मजल; रेंज १४) लहान मुलाचा मुका १५) बाभळीच्या शेंगेतील बी १७) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना १९) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे २०) फडशा; निकाल; फैसला; उत्पन्नाचा हिशोब २२) वस्त्रप्रावरण; कापडचोपड

**उभे शब्द :-** १) ज्याचे माप करता येत नाही असे २) गळ्याची मागची बाजू; आदर ३) वजनदार; प्रतिष्ठित; पत असलेला ४) पंख असलेली गोष्टीतील स्त्री ५) चल; जंगम; हेर; खंदक; हाळ ६) गायनातील एक राग ८) उत्तराधिकारी; हक्कदार ११) प्रहार; रट्टा; तडाखा; एक प्रकारचे आवेशयुक्त गीत १२) गुराखी; श्रीकृष्ण १४) घर वगैरे भाड्याने घेताना घरमालकाकडे ठेवतात ती अनामत रक्कम १६) पलीकडे; पैलतीर १८) नजीक; जवळ १९) समूह; जुडगा २०) एक धान्य २१) अधिकार; अंमल

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वारसा हा वस्तुंचा नसतो विचारांचा असतो.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## तणाव कमी करण्यासाठी डार्क चॉकलेट प्रभावी आहे का?

आजच्या व्यस्त जीवनात तणाव आणि चिंता या सामान्य समस्या झाल्या आहेत. अशा परिस्थितीत, एक प्रश्न अनेकदा उद्भवतो - डार्क चॉकलेट तणाव कमी करू शकते? डार्क चॉकलेट मध्ये अनेक पोषक घटक असतात जे मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात. हा एक प्रकारचा अँटिऑक्सिडेंट आहे, जो मेंदूचे कार्य वाढवण्यास मदत करतो. तणाव कमी करण्यासाठी आणि स्नायूंना आराम देण्यासाठी उपयुक्त आहे. सेरोटोनिन हे आनंदी संप्रेरकचे उत्पादन वाढवते, ज्यामुळे मूड सुधारतो.

अनेक अभ्यासात असे आढळून आले आहे की डार्क चॉकलेट खाल्ल्याने तणाव आणि चिंतेची लक्षणे कमी होतात.

२०१४ च्या अभ्यासात असे दिसून आले आहे की गडद चॉकलेटमध्ये आढळणारे फ्लेव्होनॉइड्स मेंदूला रक्त प्रवाह सुधारतात, ज्यामुळे व्यक्ती अधिक शांत होते. डार्क चॉकलेट खाल्ल्याने एंडोर्फिन आणि सेरोटोनिनची पातळी वाढते, ज्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते. डार्क चॉकलेट मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते, पण ते मर्यादित प्रमाणातच घेतले पाहिजे, असे डॉक्टरांचे मत आहे. डार्क चॉकलेटचे जास्त सेवन केल्याने वजन वाढू शकते आणि साखरेची पातळी प्रभावित होते.

जर तुम्हाला डार्क चॉकलेटचा आहारात समावेश करायचा असेल तर या गोष्टी लक्षात ठेवा. ७०% पेक्षा जास्त कोको असलेले गडद चॉकलेट निवडा. दररोज २०-३० ग्रॅमपेक्षा जास्त खाऊ नका. ते अल्प प्रमाणात स्नॅक म्हणून किंवा जेवणानंतर खा.

डार्क चॉकलेट निश्चितपणे तणाव आणि चिंता कमी करण्यास मदत करू शकते, परंतु ते कमी प्रमाणात सेवन करणे महत्वाचे आहे. जर तुम्हाला तुमच्या आहारात याचा समावेश करायचा असेल तर आधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## शक्तीचा अहंकार

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका जंगलात एक हत्ती राहायचा. त्याला आपल्या शरीरावर आणि शक्तीवर खूप गर्व होता. वाटेत कोणताही प्राणी भेटला तर त्याला त्रास द्यायचा आणि घाबरवायचा. एकदा तो रस्त्याने चालला होता. रस्त्यात एका झाडाखाली त्याला एक पोपट बसलेला दिसला व त्याला म्हणाला, ''मला नमस्कार कर.'' पोपट नाही म्हणाला. हत्तीला राग आला व त्याने ते झाड उपटून टाकले. पोपट उडून गेला त्याला पाहून हत्ती हसायला लागला. मग एके दिवशी हत्ती पाणी पिण्यासाठी नदीकाठी गेला. तिथे मुंग्यांचे घर होते. एक मुंगी स्वतःसाठी अन्न गोळा करत होती. हे पाहून हत्तीने विचारले की,

''तू काय करते आहे?''

यावर मुंगी म्हणाली,

''पावसाळा येण्याआधी स्वत:साठी अन्न गोळा करत आहे, जेणेकरून पावसाळा कोणत्याही अडचणीशिवाय निघून जाईल.'' हे ऐकून हत्तीने आपल्या सोंडेत पाणी भरले आणि मुंगीवर ओतले. पाण्यामुळे मुंग्यांचे जेवण खराब झाले. हे पाहून मुंगीला खूप राग आला आणि तिने हत्तीला धडा शिकवण्याचे ठरवले.

एकदा हत्ती झोपलेला होता. मुंगी हळूच हत्तीच्या सोंडेमध्ये शिरली आणि त्याला आतमधून चावायला लागली. ज्यामुळे हत्तीला खूप दुखायला लागले. हत्ती रडायला लागला व मदत मागायला लागला. पण कोणीही त्याला त्याच्या स्वभावामुळे मदत केली नाही. आता मुंगी हत्तीच्या सोंड मधून बाहेर आली. हत्तीने मुंगीची माफी मागितली. हत्ती आता पूर्णपणे बदलला व त्याने ठरवले की, तो आता कोणालाही त्रास देणार नाही व सर्वांची मदत करेल.

**तात्पर्य :** आपल्या शक्तीवर कधीही अहंकार करू नये.

# रहमते दर्शन (भाग - १)



यही है वह सबसे बड़ी देन, जो जिंदा-जावेद सत्गुरु हमें देते हैं। वो हमें सिर्फ अन्तर में प्रभु की दिव्य ज्योति एवं श्रुति से ही नहीं जोड़ते, बल्कि वे हमारे ऐसे मित्र हैं जो हमारी इस दुनिया की सभी मुश्किलों में हमारी मदद करते हैं।

महाराज दर्शनसिंह जी कहा करते थे कि अगर तुम्हारे मन में कोई प्रश्न है, तो पहले उसे (मन को शांत करो, क्योंकि भजन- अभ्यास करने के लिए ये ज़रूरी है कि हम पहले अपने मन को संतुष्ट करें। इसीलिए वे लोगों को तब तक समझाते, जब तक वो पूरी तरह से संतुष्ट नहीं हो जाते थे। इसी तरह अगर किसी को अपनी समस्या का हल मिल नहीं रहा और इसका उसके दिमाग पर बहुत भार पड़ रहा हो और वो भजन - अभ्यास समेत किसी भी चीज़ पर ध्यान नहीं दे पा रहा हो, तो महाराज जी हल निकालने में उसकी मदद करते। यह सबसे बड़ा फ़ायदा है जो किसी जिंदा-जावेद सत्गुरु के चरणों में पहुँच कर हमें होता है। वे हमारी जिन्दगी के प्रत्येक क्षेत्र में मदद करते हैं।

### प्रस्तावना

सत्गुरु से इस प्रकार की मदद पाने के कई तरीके हैं। अगर हम उन्हें शारीरिक तौर पर नहीं मिल सकते, तो हम पत्र लिख सकते हैं। संत दर्शनसिंह जी महाराज फ़रमाया करते थे कि कैसे पत्र लिखने भर से ही उनको मदद मिल गई। इसके साथ ही उन्होंने यह भी जोड़ दिया कि महाराज जी सब कुछ जानते हैं, चाहे हमें पत्र लिख लें और उसे पोस्ट न भी करें, तब भी हमारी प्रार्थना सुनी जाती है व हमें जरूरी मदद तुरन्त मिलती है। वो हँसते थे कि, इस तरह हम डाक का खर्च भी बचा लेते हैं। जैसे प्रभु हाथी की चिंघाड़ से पहले चींटी के दिल से निकली पुकार को पहले सुनते हैं। इसी तरह सत्गुरु अपने भक्तों के दिलों की आवाज को एकदम सुनते हैं व उसका तुरन्त जवाब देते हैं। यह सब हम ने इन महापुरुषों की हुजूर बाबा सावनसिंह जी महाराज की, परम संत कृपालसिंह जी महाराज की और दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की जिन्दगी में कई बार देखा है।

आइये, उनकी असीम प्रेम, दया मेहर और किस प्रकार उन्होंने हमारी जिन्दगियों को छूआ, उन सब को याद करें। अतुलनीय तोहफा प्रेम का, दया का जो उन्होंने हमें दिया, उसे दर्शायें और सारी मानवता में उसे बाँटे, ताकि आने वाली पीढ़ियाँ उनकी महानता को जान सके। उनके उन तरीकों को जान सकें जिनसे उन्होंने हम सबमें प्रेम की दौलत बाँटी ।

अंत में मैं संत दर्शनसिंह जी महाराज का एक शेर कहना चाहूँगा, जो हमें ये बताता है कि वो कैसे हर इंसान को जो भी उन्हें मिला. इतना प्यार दे सके। महाराज जी कह रहे हैं:

मैंने सीखा है जमाने से मुहब्बत करना। तेरा पैग़ामे-मुहब्बत मेरे काम आया है ।।

- मताए-नूर (उर्दू गजल-४४)

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

वह खुद को पसंद करने लगता है। जब तक सामने वाले की बात पूरी हो जाए तो एक दम से अपना उतर देने की तलब को रोकना है। लोग यह इंतजार करते हैं कि सामने वाले की बात खत्म हो तो वह अपनी राय या कमेंट के साथ बीच में ना कूद पड़े। अधिकतर लोग सुनना नहीं चाहते केवल सज्ञनता से प्रतीक्षा भर करते हैं। आप ध्यान से सुनेंगे तो उसे अहसास होगा आप उसकी कितनी कद्र करते हैं। जब आप शांति से सुनते हैं तो सामने वाले को मन के गहरे स्तर पर सुन रहे होते हैं। आप उसका कहा और अनकहा दोनो ही सुन रहे हैं। कोई बात समझ न आये तो उसी समय पूछ लें। अपनी बातचीत में आकर्षण बनाए रखने के लिए, बात सुनते हुए गर्दन हिलाएं। ध्यान से बात सुने और ऐसे दिखायें मानो उसकी बात से ज्यादा सुन्दर बात तो कोई और हो ही नहीं सकती। दूसरे लोगों से वही करवाएं जो वह चाहते हैं। उन्हें ऐसा सोचने दें कि वे स्वंय के विचार पर कार्य कर रहे हैं। प्रत्येक मनुष्य के भीतर सब से गहरी इच्छा यही होती है कि उसे महत्वपूर्ण माना जाए। जिन लोगों के संपर्क में आते हैं उनसे ऐसे बात करो जैसे वह बहुत महत्वपूर्ण हैं। जो लोग स्नेही हैं और घर से बाहर जाते हैं। तब उन्हें मन से सदा सामने देखते रहो, उन्हें मन से प्यार देते रहो आप का यह प्यार उन्हें मिलता रहेगा। ऐसे ही विश्व की आत्माओं के प्रति मन से प्यार करते रहो। इस से सारे विश्व की आत्माओं को स्नेह अनुभव होगा। किसी भी व्यक्ति की निंदा, आलोचना या शिकायत करने से बचें। समय प्रबन्धन और बर्ताव आलोचना सब से बदतर बर्ताव माना जाता है। बचपन में मिली आलोचना वयस्क जीवन को नष्ट कर देती है। इसे शब्दकोश से हटा दें। किसी बात पर बहस न करें। उसे दोष मत दो। अगर दोष देगें तो वह आप से बात करना छोड़ देगा। आप उसे समझा नहीं सकेंगे कि उस से कोई भूल हुई है। कोई कड़वी बात कहता है तब उसे कहो, आप ने ऐसा क्यों कहा, आपने ऐसा कहां सुना। उसे कहें आप अपना नजरिया समझाने में मुझे मदद करें। यदि सामने वाला किसी बात पर सही नहीं होता, उस बात पर ध्यान न दें। इस से कोई फर्क नहीं पड़ता। बहुत से लोग दूसरों की हामी पाने के लिए चीखते- चिल्लाते हैं। उन की इस इच्छा को पूरा करने के लिए, जब भी किसी से मिलें, मुस्कराते हुए मिलें। मन में तो मुस्कराना ही है और हो सकें तो बोलते हुए कहें, आप मेरे लिए मूल्यवान हैं। इस से वह आप को पसंद करेंगे और आप को चाहने लगेंगे। आप के लिए उन में प्रसन्नता का भाव आएगा। इस लिए मन तथा यथा संभव दूसरों की सराहना करें। अपनी प्रशंसा सब को अच्छी लगती है। लोगों को उनकी उपलबधियों निजी गुणों की सराहना करें। उनके घर और समान की प्रशंसा करें। किसी को महत्वपूर्ण महसूस करवाना है तो उन की प्रशंसा का कोई न कोई बहाना मिल ही जाएगा। दूसरों की प्रशंसा से उसे अपनी योग्यताओं पर गर्व होने लगता है। वह आप के साथ काम करना चाहेगा। जब आप दूसरों पर ध्यान देते हो तो बिना शब्दों के जता सकते हैं कि वह कितने अनमोल हैं। उनकी बात सुनना छोड़ कर दूसरी ओर देखने लग जाएंगे तो वह बुरा मान जाएगा। जितना लोगों से अच्छा व्यवहार करेगें उतना आप का समय बचेगा और अच्छे कार्यों में लगेगा। आप निंदा करते हैं तो वे नाराजगी और गुस्सा महसूस करने लगते हैं। उतना आप का समय बचेगा और अच्छे कार्यो में लगेगा।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

प्रसूती सुखरूप होण्यासाठी शरीर व मनः स्वास्थ्यासाठी व्यायाम उपयुक्त ठरतो. गर्भावस्थेत निर्माण होणाऱ्या अनेक संप्रेरकांमुळे (हार्मोन्स) सांधे व स्नायू शिथिल होतात व त्यामुळे कंबर दुखणे, पाठ दुखणे उद्भवते. जर स्नायूंचा वापरच केला नाही, तर त्याला देखील एक प्रकारचा गंज चढल्यासारखेच होते. रक्तपुरवठा व्यवस्थित होत नाही; त्यामुळे सिझेरियनचे प्रमाण वाढते; म्हणून शरीराची व मनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व्यायाम करावा. अतिशय शांतपणे अंगाला जोरात झटके न देता व्यायाम करावा.

८) पोटावर पालथे पडण्याचे कुठलेही आसन करू नये.

९) आसने, प्राणायाम करण्याची जागा स्वच्छ व हवेशीर असावी. चालणे: हा व्यायाम प्रकार सर्वांत सोपा आहे. गर्भवतीने रोज सकाळी १५-२० मिनिटे चालण्याचा व्यायाम करावा. सकाळच्या वेळेत शक्य होत नसेल, तर दिवसभरात कधीही सोयीनुसार चालण्याचा व्यायाम करावा. चालण्यामुळे मांड्यांचे, कंबरेचे, पायाचे, ओटी पोटाचे स्नायू मजबूत होतात; त्यामुळे सुलभ, नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत होते. चालताना हातांची सुद्धा हालचाल करावी. खूप भरभर किंवा संथ गतीत चालू नये. एका विशिष्ट लयीमध्ये चालावे. चालल्यानंतर थकवा वाटत असल्यास पायाखाली उशी घेऊन झोपावे किंवा शवासन करावे.

### व्यायामाचे प्रकार

**दीर्घश्वसन :** गर्भावस्थेमध्ये शरीराला प्राणवायूची आवश्यकता जास्त असते. याकरिता दीर्घश्वसनाचा फायदा होतो. श्वसनावर लक्ष केंद्रित करून श्वास आत घ्यावा व सावकाश सोडावा. याकरिता सकाळची वेळ उत्तम असते. बिछान्यावरच सुखासनात बसून मन एकाग्र करावे. आपले दोन्ही हात पोटावर ठेवून श्वास व्यवस्थित आत घ्यावा. श्वास घेत असताना पोटाचा घेर वाढत आहे हे हातांना जाणवले पाहिजे. नंतर श्वास सावकाशपणे बाहेर सोडावा. सकाळची वेळ जमली नाही, तर दिवसभरात कधीही केले तरी चालते.

प्राणायाम : प्राणवायूचा शरीराला जास्तीत-जास्त पुरवठा होण्यासाठी केलेल्या व्यायाम प्रकारास प्राणायाम असे म्हणतात. गर्भस्थ बाळाला जास्तीत-जास्त प्राणवायूचा पुरवठा होऊन त्याची वाढ चांगली व्हावी याकरिता प्राणायाम करावेत.

अ) अनुलोम-विलोम प्राणायाम : या प्राणायामामध्ये आलटून-पालटून दोन्ही नाकपुड्यातून श्वास घ्यावा.

कृती - पद्मासनात किंवा सुखासनामध्ये बसावे. त्यानंतर हातांची ध्यानमुद्रा करावी. नंतर ताठ बसावे. प्रथमतः नाकाने पूर्णपणे श्वास सोडून द्यावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००



वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध बेल्ट परीक्षेत सहभागी होऊन घवघवीत यश मिळविले आहे. यावेळी मुख्य प्रशिक्षक हारून शेख, रमजान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख, दीपाली भालेराव आदी उपस्थित होते.

# कराटे खेळ विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवते

### हारून शेख यांचे प्रतिपादन; वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटेच्या विद्यार्थ्यांचे विविध बेल्ट परीक्षेत यश

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध बेल्ट परीक्षेत सहभागी होऊन घवघवीत यश मिळविले आहे. कराटे खेळामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता अत्यंत सुदृढ बनते, कराटे मुळे बुद्धी तेज व तल्लख बनते. कराटे शिकणे हि एक कला आहे. सध्याच्या काळात मुला–मुलींना कराटेचे प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुख्य प्रशिक्षक हारून शेख यांनी म्हंटले आहे.

विविध बेल्ट परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी खालीलप्रमाणे यलो बेल्ट – आरवी मानधने, आराध्या अजबे, दिव्यांशी मोटे, गार्गी काळे, बुऱ्हानुद्दीन लतिफ़जीवाला, ध्रुव कर्पे, श्लोक वाघ, साक्षी जोशी, अनन्या कर्पे, आराध्या खंडेलवाल, ऑरेन्ज बेल्ट – आयुष कुटे, अरहम फिरोदिया, दिव्येश कांबळे, अनन्या रासकर, सिद्धी ठोंबरे, ग्रीन बेल्ट – ओम शिंदे, अनुष्का रासकर, ब्ल्यू बेल्ट – आरुष डांगे, स्पर्श कांकरिया, कैवल्य नरवडे, संचित कुलट, अर्णव बोथरा, शौर्य चिंता, सुजित कुलट, पर्पल बेल्ट – अनुष्का कोहक, संस्कृती राऊत, नैतिक कंठाळी, ब्लॅक बेल्ट – कस्तुरी नरवडे. कराटे परीक्षा पर्यवेक्षणासाठी ब्लॅक बेल्ट – ईशान होशिंग, स्वराज नारायणे, विधी गुंदेचा, अहना भंडारी, आदित्य बोरा, पार्श्व भंडारी, आशिष शिंदे

खेळाडूंना मार्गदर्शन म्हणून मुख्य प्रशिक्षक हारून शेख, रमजान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख, दीपाली भालेराव यांनी काम पाहिले.

# प्रत्येकाने ज्ञान मिळविण्याची महत्त्वकांक्षा बाळगावी

### रमाकांत कुलकर्णी यांचे प्रतिपादन; सीताराम सारडा विद्यालयात स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात



हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

नगर – जशी जशी नवीन पिढी बदलते. तसे नवीन पिढीतील ज्ञान वाढत आहे. विद्यार्थ्यांनी हा विषय अवघड आहे, हे शिकून मला पुढे काय फायदा होईल हा विचार ज्ञानापासून लांब नेतो. प्रत्येकाने आपली शाळा, आपले शिक्षक यांचे आभार मानायला हवेत. ज्याप्रमाणे संगीतकार व गायक दररोज रियाज करून सुंदर गाणे गातात.त्याचप्रमाणे प्रत्येकाने दिलेल्या अभ्यासाचा सराव करावा. प्रत्येकाने ज्ञान मिळवण्याची महत्वाकांक्षा बाळगावी, असे प्रतिपादन पुणे येथील उद्योजक रमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील उद्योजक रमाकांत कुलकर्णी होते. तर प्रमुख उपस्थितीत सौ.माया कुलकर्णी, प्रमुख अतिथी मिलिंद गंधे, रोटे.स्वाती गुंदेचा, सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, दादा चौधरी मराठी शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, हिंद सेवा मंडळाचे कार्य.सदस्य विष्णू सारडा, सीए अशोक गुर्जर, डॉ.विद्याधर पुंडे, अंजली वैद्य, ईश्वर बोरा, संजय मुदगल, सचिन चोपडा, मुख्याध्यापक विठ्ठल ढगे, पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी, दिपक आरडे, अशोक डोळसे, दिपक शिरसाठ, सुनिल कुलकर्णी, नितीन केने, शिक्षक प्रतिनिधी रवींद्र चोभे, सौ.वृषाली जोशी, अमोल कदम, गोवर्धन पांडुळे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

उद्योजक मिलिंद गंधे म्हणाले, पालकांनी विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवावे. मोबाईल मुळे मित्र, मैत्रिणी व पालक व विद्यार्थी यांच्यामधील संवाद कमी होत आहे. ऑस्ट्रेलियाने १६ वर्षाखालील मुलांना मोबाईल वापरण्याची बंदी हा नियम केला आहे. मोबाईल मुळे जग जवळ आले आहे पण मोबाईल मधून आपण काय शिकावे? हे विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी जागृत होऊन टीव्ही व मोबाईल पासून दूर राहावे.

स्वाती गुंदेचा म्हणाले, आनंदी विचार असले तर आयुष्य सुंदर बनते. सकारात्मक विचार ठेवले तर चांगल्या गोष्टी घडतात. आयुष्यात जगत असताना प्रत्येकाने माणूस म्हणून जगले पाहिजे.

सीए अशोक गुजर म्हणाले, मुलांपेक्षा मुली काळजीपूर्वक शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रीयन मुले इंग्रजी बोलता येत नाही म्हणून मागे पडतात. दररोज इंग्रजी बोलण्याचा सराव केल्यास विद्यार्थी जीवनात यशस्वी होतील.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, हिंद सेवा मंडळ हे नगर जिल्ह्याचे भूषण आहे. शाळेचे माजी विद्यार्थी प्रमुख पाहुणे रमाकांत कुलकर्णी यांनी प्रतिकूल परिस्थितीत यश मिळवून पुणे येथे उद्योजक म्हणून कार्य करीत आहेत. ही हिंद सेवा मंडळासाठी अभिमानास्पद बाब आहे. डॉ.पारस कोठारी म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे त्यांचे अभिनंदन तसेच विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील राहून शाळेच्या प्रगतीत वाढ करावी.

प्रास्ताविकात अजित बोरा म्हणाले, ज्या स्पर्धकांनी क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन पारितोषिके मिळवली आहेत, त्यांचे अभिनंदन. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यांचेही अभिनंदन.

वार्षिक अहवालाचे वाचन मुख्याध्यापक विठ्ठल ढगे यांनी केले.

सुत्रसंचलन नितीन केणे यांनी केले. तर आभार गोविंद धर्माधिकारी यांनी मानले.

# छत्रपती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीचे क्रीडा सप्ताह तायक्वांदो स्पर्धेत यश




क्रीडा सप्ताह स्पर्धेत छत्रपती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीचे यशस्वी खेळाडू.

नगर – जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर, जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर आणि अहिल्यानगर ऑलिंपिक असोशिएशन, अहिल्यानगर १२ ते १८ डिसेंबर क्रीडा सप्ताह निमित्त आयोजित जिल्हा सब– जुनियर तायक्वांदो स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यात ८७ मुले आणि ५५ मुली अश्या १४२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे आयोजित जिल्हा सब– जुनियर तायक्वांदो स्पर्धेत छत्रपती अ‍ॅकॅडमीचे १४ खेळाडू सहभागी झाले होते त्यात विजयी झालेल्या मुलांची नावे खालीलप्रमाणे १) कार्तिक काळे– सुवर्णपदक, २) रोहित शिंदे – सुवर्णपदक, ३) अक्षरा शिंदे – सुवर्णपदक, ४) तेजल पवार – सुवर्णपदक, ५) अविष्कार गुंजाळ– रौप्यपदक, ६) संघर्ष वाटुरे – कांस्यपदक, ७) मनस्वी शिंदे – कांस्यपदक, ८) स्वराज शिंदे –कांस्यपदक, ९) हरिदास धोत्रे – कांस्यपदक, १०) रौनक दाळवाले – सहभाग, ११) लक्ष्य दाळवाले – सहभाग, १२) आदित्य शिंदे – सहभाग, १३) श्रावणी वाघ– सहभाग, १४) गौरव वाघ – सहभाग

विजयी मुलांचे छत्रपती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीचे सचिव व मुख्य प्रशिक्षक नारायण कराळे सर, विक्रम भगत, सुनिल कराळे, गुंजाळ मॅडम व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



### भक्तिमय वातावरणात नाताळ आनंद उत्सव कार्यक्रम उत्साहात

रेल्वे स्टेशन रोड कोठी या भागातील क्लेराबुस हायस्कूलच्या मैदानात प्रार्थना आधार अहिल्यानगर पास्टर व रेवरेंट असोसिएशन अहिल्यानगर व ख्रिश्चन युथच्यावतीने आयोजित नाताळ सणानिमित्त नाताळ आनंद उत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन स्वप्निल शिंदे यांनी केले व या कार्यक्रमांमध्ये कर्नाटक येथील हुबली पास्टर बेजामीन सोनघर व अरोज मिनिस्ट्रीजचे पास्टर अजिंक्य पवार यांच्या उपस्थितीत पार पडला व सिटी कनेक्टर्स ग्रुपच्या भक्तीमय गीताने आनंद उत्सव साजरा करण्यात आला. सर्वांसाठी प्रार्थना करून नाताळ सणानिमित्त व नवीन वर्षाच्या एकमेकांना शुभेच्छा देण्यात आले. यावेळी नागरिक उपस्थित होते.



ग्रीनव्हॅली प्रीस्कूल येथे आजी–आजोबा दिन साजरा करण्यात आला.

# ग्रीनव्हॅली प्रीस्कूल येथे आजी-आजोबा दिन साजरा

नगर – आजी–आजोबा हे प्रत्येक घराचे मुळ असतात आणि लहान मुलं ही त्यांची छोटी रोपं असतात. ज्यांची वाढ आणि विकास या मुळांच्या बळावर अवलंबून असतो. त्यानिमित्त प्रत्येक आजी–आजोबांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आजी–आजोबांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुलांनी संस्कृत, इंग्रजी आणि हिंदीतही गाणी गायली. मुलांनी नृत्य केले आणि आजी, आजोबा, तुम्ही आमचा मार्गदर्शक तारा आहात अशी कविता देखील वाचली.

सर्व आजी–आजोबांना समर्पित केलेल्या भाषणात, ग्रीन व्हॅली प्रीस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती उमंग नंदा यांनी मुलांच्या जीवनात आजी–आजोबांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. ते मुलांची भाषा, उच्चार, सामाजिक आणि भावनिक विकासात, जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. मुलांसाठी त्यांचे बिनशर्त प्रेम अनमोल असते असे सांगितले.

यावेळी आजी–आजोबाही आनंदाने सहभागी होऊन नाचले. आजी–आजोबांनी मुलांसाठी आणि शाळेने केलेल्या प्रामाणिक तयारीबद्दल त्यांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. करिश्मा रामदासी, सौ. वर्षा कुलथे, मिस हर्षदा त्रिभुवन, सौ. आकांक्षा बोरुडे, सौ. वैशाली यांनी परिश्रम घेतले.

# केडगावच्या महाराणी ताराबाई विद्यालयात गणित, विज्ञान व कला प्रदर्शनाचे उद्घाटन



केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात गणित, विज्ञान व कला प्रदर्शनाचे उद्घाटन करताना विद्यार्थी व शिक्षकवृंद.

नगर – केडगाव येथील राजर्षी शाहू प्रसारक मंडळाचे महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणाऱ्या गणित, विज्ञान, चित्रकला, हस्तकला व पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ, महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाचे राज्य अध्यक्ष संजयकुमार निक्रड, बबन साळवे, राजेश सोनवणे, जालिंदर सातपुते, सखाराम गारुडकर, नामदेव वायळ, मनीष थोरात, वनिता जाधव, राजेश्री वायभासे आदींसह शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक उपस्थित होते.

आकाश दरेकर म्हणले की, आपल्या जीवनात यश मिळविण्यासाठी सर्वात महत्त्वाचा वाटा शिक्षक व आई–वडीलांचा असतो. चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनीना पुढे जाण्याची संधी आहे. पुढे जाण्याची व ध्येय गाठण्याची वृत्ती ठेवावी. शाळेत होणाऱ्या स्पर्धेत सहभाग घेतला पाहिजे. हारण जिकणे चालू राहते, पण स्पर्धेत उतरणे महत्त्वाचे असते. अलीकडच्या काळात पोलीस, आर्मी, एअरफोर्स याठिकाणी सुध्दा मुली काम उत्तमपणे कामगिरी बजावत आहे. मुली मुलांपेक्षा कमी नसून, कर्तृत्व सिध्द करण्याचे मुलींना आवाहन केले.

प्राचार्या वासंती धुमाळ म्हणल्या की, कुठलाही शोध लागत असेल, तर तो गरजे पोटी लागत असतो. ए.आ. मुळे जगात झपाट्याने बदल होणार आहे. भविष्यातील गरजा ओळखून विद्यार्थ्यांनी संशोधकवृत्तीने प्रकल्प बनविण्याचे त्यांनी सांगितले. तर मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचण्याचे आवाहन केले.

या प्रदर्शनात २८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थिनींना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणाऱ्या विविध विषयांची पुस्तके ठेवण्यात आली होती. तसेच कला प्रदर्शनात पेन्सिल स्केच, विविध चित्रांचे विद्यार्थिनींनी रेखाटन केले होते. कागदापासून मासा, अक्रोडा पासून कासव, फोटो फ्रेम, वॉल हैंगिंग, पणती डेकोरेशन, आकाश कंदील यांसारख्या विविध हस्तकलेचे वस्तू विद्यार्थ्यांनी सुबकरीत्या तयार केल्या होत्या.

गणित–विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थिनींनी बेरीज, वजाबाकी, आधीचा नंबर नंतरचा नंबर, भारतीय चलन, वाहतूक नियंत्रण, पौष्टिक अन्न, वाहतूक, विविध प्रकारच्या घरांची प्रतिकृती, पाण्याची बचत, नैसर्गिक रित्या शेती, समतोल आहार, हायड्रोलिक पूल, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण यांसारख्या उपकरणांची मांडणी केली होती. प्रास्ताविक छाया सुंबे यांनी केले. सूत्रसंचालन भारती गुंड व जयश्री कोतकर यांनी केले.

# अल्ट्राकेअर हॉस्पिटल येथे मोफत सर्व रोग निदान शिबीर



अल्ट्राकेअर हॉस्पिटल येथे आयोजित मोफत सर्व रोग निदान शिबीरात तपासणी करताना डॉक्टर.

नगर – जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटचे चेअरमन डॉ. रियाज व माजी नगरसेवक शेख मुदसर अहमद इसहाक यांच्या संयुक्त विद्यमाने डिएसपी चौक टॉप–अप पेट्रोल पंपासमोर फकीरवाडा येथे अल्ट्राकेअर हॉस्पिटल मोफत सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन कसरण्यात आले होते.

या शिबिरात हृदयरोग, बालरोग, स्त्रीरोग, मधुमेह, पाठ मान, गुडघे, कान, नाक, घसा, पोट आदी विकार आजारांची सुमारे ३०० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच थायरॉईड, उच्च रक्तदाब, मधुमेह, लिव्हर विकार काविळ, फुसाचे विकार दमा, निमोनिया, संसर्गजन्य आजार डेंग्यु मलेरीया, एच.आय.व्ही, किडनीची टेस्ट, कॅन्सरचे टेस्ट, सिरम कॅल्शियम, शुगर, हिमोग्लोबीन आदीची तपासणी संपूर्ण सुरक्षा केंद्र, जिल्हा रुग्णालय अ.नगर यांच्यामार्फत मोफत करण्यात आली असुन यावेळी शिबिरास डॉ. श्रीतेज जेजुरकर, डॉ. संतोष गिते, डॉ. सुनील पोखरा, डॉ. गणेश मिसाळ, डॉ. प्रियंका गायकवाड, डॉ. रियाज शेख, डॉ. अहद शेख, डॉ. प्रणिन गायकवाड, डॉ.सुरेंद्र पिंपरकर, डॉ.आलिया शेख, डॉ.हसीना मुदस्सर शेख आदी उपस्थित होते. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी अर्पिता दाते, हिना शेख, आरबाज शेख, विनय इथे, सागर फुलारी, दीपक चौरे, आदित्य करपे, अतिफ शेख, हाजी एजाज, फारुख शेख, गौरव डाके आदींनी परिश्रम घेतले.




केशरबाग येथील सहलीत सहभागी मित्र परिवार.

# 'केशर बाग' नगरमधील एक निसर्गरम्य ठिकाण

नगर – श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे ३४ वर्षांपासून कार्यरत असलेले श्री आनंद योग साधक आणि त्यांचा मित्र परिवाराची १५ डिसेंबरला मेहेर अनिल मेहेर संचलित नगर–दौंड रोड वरील खंडाळा गांवातील 'केशर बाग' या एका निसर्गरम्य परिसर सहल आयोजित केली होती. अस्सल गावरान पध्दतीचे जेवण आणि ज्याला गावरान मेवा म्हणून संबोधले जाते अशा ठिकाणी दही–चटणी–रेवडी, गुळ, गुडीशेव युक्त कोवळा लुसलुशीत हुरड्याचा सहलीतील परिवाराने मनसोक्तपणे आस्वाद घेतला.

दिवसभर निसर्गरम्य वातावरणात वेगवेगळे खेळ, गाणी, भेंड्या, शेतात मनमुरादपणे भटकंती, बैलगाडी सफर तसेच बालगोपाळांच्या चमुने थंडीत देखील तलावात उड्या मारुन एक वेगळाच आनंद अनुभवला.

श्री. व सौ. अनिल मेहेर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. श्री. व सौ.अनिल मेहेर यांनी वरील पर्वणी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे आभार श्री. व सौ. पडोळे, श्री. व सौ. नवले, राजेंद्रप्रसाद सिकची, राजीव भळगट, उमेश बलदोटा व अनिल धोत्रे यांनी आभार व्यक्त केले.

तरी सर्वांनी या केशर बागेस अवश्य भेट देऊन आपला आनंद द्विगुणीत करावा.

# श्रुती संगीत निकेतन संस्थेच्यावतीने बाल महोत्सवाचे २२ डिसेंबरला आयोजन

नगर – श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या वतीने स्व. दत्तात्रय देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृह येथे बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात गायन, वादन आणि नृत्य यांचा महोत्सव साजरा होणार आहे.

अहिल्यानगर येथील १० नामवंत संगीत विद्यालायांचे सुमारे शंभर विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. यात श्रुती संगीत निकेतन, आरोही संगीत विद्यालय, कथ्थक नृत्यालय, अंजली नृत्यालय, अनाहत तबला अकॅडमी, ब्रह्मानंद संगीत क्लासेस, सरस्वती संगीतालय, नृत्यदर्पण डान्स अकॅडमी, नृत्यझंकार, उत्कर्षा स्कूल ऑफ कथ्थक, या संगीत विद्यालयांचा समावेश आहे. डॉ.धनश्री खरवंडीकर, मकरंद खरवंडीकर, सुरेखा डावरे, प्रिया ओगले जोशी, कल्याणी कामतकर, स्वप्नील खराडे, अनुजा कुलकर्णी, अपर्णा थत्ते, शीतल देशमुख, प्रसाद सुवर्णपाठकी, कीर्ती अयचित्ते जोशी, उत्कर्षा दगडे, पुष्पा औटी या गुरुवर्यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले आहे. या महोत्सवासाठी संगीतज्ञ श्रीराम तांबोळी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. श्रावण शिंदे आणि अमोघ पळसकर हे सूत्रसंचालन करतील. या कार्यक्रमात गुंजारव या संस्कृत त्रैमासिकाच्या बाल विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या महोत्सवासाठी रसिक, विद्यार्थी आणि गुरुजनांनी उपस्थित रहावे असे आवाहन दत्तात्रय देशपांडे यांचे पुत्र डॉ. जयंत देशपांडे आणि श्रुती संगीत निकेतनच्या अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी केले आहे.

## मध्य रेल्वे पुणे विभागीय समितीवर राहुल मुथ्था यांची दुसऱ्यांदा निवड



श्रीरामपूर – मध्य रेल्वे पुणे विभागीय समितीच्या सदस्यपदी शहरातील व्यापारी राहुल रमण मुथ्था यांची दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल मुथ्था यापूर्वी सोलापूर डिव्हिजनमध्ये ही या पदावर कार्यरत होते. त्यांची या पदावर दुसऱ्यांदा निवड झाली आहे. प्रवासी आणि रेल्वे यामधील अत्यंत महत्त्वाचा दुवा म्हणून या समितीचे पदाधिकारी काम पाहतात. श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनचे ते काही काळ अध्यक्ष होते. एक निस्पृह व्यक्तीमत्व म्हणून ते समाज आणि राजकारण करतात.

राहुल मुथ्था यांच्या निवडीबद्दल खा.भाऊसाहेब वाकचौरे, आ. हेमंत ओगले, करण ससाणे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, शिवसेना उपजिल्हा प्रमुख सचिन बडदे, शहर अध्यक्ष संजय छलारे, माजी नगराध्यक्ष संजय फंड, जि.प.सदस्य बाबासाहेब दिघे, माजी नगरसेवक शशांक रासकर, श्रीनिवास बिहाणी, सुनील बोलके, महंता यादव, नितीन पिपाडा, कल्याण कुंकूलोळ, कामगार नेते नागेशभाई सावंत, आम आदमी पार्टीचे तिलक डुंगरवाल, भगवान उपाध्ये, विकी शर्मा, पत्रकार करण नवले, बाळासाहेब आगे, बाळासाहेब भांड, रमेश कोठारी, महेश रक्ताटे, प्रदीप आहेर, शफीकभाई बागवान, दीपक उंडे, सुनील नवले, नितीन शेळके, मिलिंद साळवे, मयूर पांडे, सचिन उघडे, भाजपचे सतीश सौदागर, दत्तनगर ग्रामपंचायतचे प्रेमाचंद कुंकूलोळ, सुनिल शिरसाठ, कुंभार समाजाचे नेते भरत जगदाळे, मर्चंटचे अध्यक्ष सुनील गुप्ता, सेक्रेटरी दत्तात्रय धालपे, संजय शाह, विशाल पोफळे, मुकेश कोठारी, विलास बोरावके, उमेश अग्रवाल, निलेश ओझा, बाळासाहेब खबिया, बाळासाहेब कसलीवाल, निलेश बोरावके, धर्मेश शाह, अनिल लुल्ला, निलेश नागले, राहुल कोठारी आदींनी अभिनंदन केले.

## मनपाच्या बुरुडगाव रस्त्यावरील अद्ययावत रुग्णालयाच्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात

### नगरकरांसाठी १०० बेडच्या सर्वसुविधांयुक्त रुग्णालयातून आरोग्य सेवा मिळणार; आयुक्त यशवंत डांगे यांनी घेतला कामाचा आढावा



नगर – महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून बुरुडगाव रस्त्यावरील महानगरपालिकेच्या जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन अद्ययावत रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. सद्यस्थितीत ७५ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामालाही गती देण्यात आली असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी मंगळवारी या कामाची पाहणी करून आढावा घेतला. चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ या जागेमध्ये अद्यावत रुग्णालय बांधण्यात येत आहे. त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी २३.८४ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. इमारतीमध्ये तळघर, तळमजला व त्यावर चार मजल्यांची इमारत बांधण्यात येत आहे. तळघरात पार्किंग, तळ मजल्यावर ओपीडी व लॅब, पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर जनरल वॉर्ड, आयसीयु व ऑपरेशन थिएटर, तिसऱ्या मजल्यावर प्रायव्हेट रूम, डॉक्टर कक्ष, चौथ्या मजल्यावर कॅन्टीन, सेमीनर हॉल, डॉक्टर कक्ष असणार आहे. इमारतीत नागरीक, रुग्णांसाठी २ पॅसेंजर लिफ्ट व १ स्ट्रेचर लिफ्ट असणार आहे.

१०० बेडचे रुग्णालय असून आरसीसी बांधकाम, प्लॅस्टरचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, आतील बाजूने दुसऱ्या मजल्यापर्यंत टाईल्सचे काम पूर्ण झाले आहे. जिन्याच्या ग्रॅनाईटचे संपर्ण बिल्डींगचे काम पूर्ण केले असून, आगप्रतीबांधक उपाययोजनांचे अंतर्गत लाईनचे संपूर्ण मजल्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. दुसऱ्या मजल्यापर्यंत प्लंबींगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित कामांना गती देण्यात आली आहे.

महानगरपालिकेने या कामापोटी ठेकेदार संस्थेला आत्तापर्यंत १८.८५ कोटींची बिले अदा केली आहेत. इमारतीला संरक्षक भिंत, परिसर सुशोभिरण व मुख्य रस्त्याला जोड रस्ते यासाठी ३.१७ कोटींचा खर्च येणार आहे. त्यासाठीही कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. नागरी स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत फर्निचर व्यवस्था, डिजीटलायजेशन व आयटी सोल्युशनसह बिल्डींग पूर्ण करण्याकरीता ३.३५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, रुग्णालयाच्या उभारणीनंतर तेथे आवश्यक असणारे वैद्यकीय अधिकारी, इतर वैद्यकीय कर्मचारी, लॅब टेक्निशियन व इतर मनुष्यबळ आऊटसोर्सिंगद्वारे भरण्यात येणार आहेत.

नागरिकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले आहे.

## भाऊसाहेब फिरोदियात कला, गणित, विज्ञान, भूगोल पर्यावरण रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन



भाऊसाहेब फिरोदियात हायस्कूल येथे कला, गणित, विज्ञान, भूगोल पर्यावरण रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व कल्पकतेला वाव देण्यासाठी कला, गणित–विज्ञान, भूगोल–पर्यावरण, रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. देश विदेशात वास्तुविशारद म्हणून नावाजलेल्या अहिल्यानगरच्या कविता जैन यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, उपमुख्याध्यपिका आशा सातपुते, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, विष्णू गिरी, कैलास साबळे, शिक्षक प्रतिनिधी उज्वला भंडारी, विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार चेमटे, विद्यार्थिनी प्रतिनिधी श्रुती रक्टाटे उपस्थित होते.

विद्यार्थिनींनी उत्कृष्ट रांगोळी रेखाटून स्त्री भ्रुण हत्या, पर्यावरण रक्षण व महिलांवरील अत्याचार थांबविण्याचा सामाजिक संदेश दिला. गणित–विज्ञान व भूगोल पर्यावरण प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करुन आपल्यातील कल्पनाशक्ती व कौशल्याची चुणूक दाखवली. तर कुंचल्यातून कागदावर रेखाटलेल्या चित्र हुबेहूब जिवंत केले, तसेच मंदिर व विविध वास्तूंचे मॉडेल तयार करण्यात आले होते. या प्रदर्शनास शिक्षक व पालकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनासाठी भरपूर मेहनत घेऊन अध्यापक व पालकांच्या मार्गदर्शनाखाली कलाकृती व प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती व प्रकल्प साकारुन मोबाईल पासून दूर कसे राहता येईल, याचा संदेश कविता जैन यांनी उद्घाटनाप्रसंगी दिला. तर प्रदर्शन हे जरी एक दिवसासाठी भरवले जात असले तरी त्यासाठी अगोदर महिनाभर विद्यार्थ्यांना प्रचंड मेहनत करावी लागते. यातूनच भविष्यात फक्त अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींना महत्त्व न देता कलेलाही महत्त्व दिले पाहिजे तसेच या विद्यालयाचे विद्यार्थी मेहनतीच्या जोरावर विद्यालयाचे नाव भविष्यात उज्वल करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

व्यक्तिचित्र, वारली चित्र, पेन्सिल शेडिंग इ. प्रकारचे चित्र विद्यार्थ्यांनी काढलेली होती. तसेच ज्वालामुखी, पिन होल कॅमेरा, विद्युत लिफ्ट यासारखे प्रयोगांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी आपल्या मॉडेलच्या माध्यमातून दाखविले. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या शाळेची प्रतिकृती, महाकालेश्वर मंदिर प्रतिकृती व श्रीराम मंदिराची प्रतिकृती या हस्तकलेच्या वस्तू प्रदर्शनाचे आकर्षण ठरले. मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा सहभाग या प्रदर्शनातून दिसून आला.

प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांचे अ.ए.सो. चे प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, सहकार्यवाह गौरव फिरोदिया यांनी कौतुक केले.

## दादा चौधरी विद्यालयाचे २० डिसेंबर रोजी स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ



नगर – हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात ८८ वे वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन कार्यक्रम २० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, प्रमुख पाहुणे उद्योजक सुधीर लांडगे हे आहेत.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितीत हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, हिंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष रविंद्र गुलाटी, महेश कुलकर्णी, प्रदिप मुथ्था, ॲड.अमृत मुथ्था, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य प्रा.मकरन्द खेर, सुमतीलाल कोठारी, डॉ.पारस कोठारी, सुजित बेडेकर, जगदीश झालानी, श्याम सुंदर सारडा, डॉ.रमेश झरकर, सुरेश चव्हाण, सौ.ज्योतीताई कुलकर्णी, मधुसूदन सारडा, अशोक उपाध्ये, दिलीप शहा, अनिल देशपांडे, विष्णू सारडा, रणजित श्रीगोड, अरुण दुग्गड, शालेय समिती सदस्य जवाहर मुथ्था, संजय बोगावत, विजय गुंदेचा, नरेश पांडव, सेवक प्रतिनिधी सहाय्यक सचिव बाळासाहेब कुलकर्णी, योगेश देशमुख (सहाय्यक सचिव), गिरीश पाखरे, कल्याण लकडे, आदिनाथ जोशी, मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, प्राचार्य सुनिल सुसरे, मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री नन्नवरे, शिक्षक प्रतिनिधी प्रसाद सामलेटी, शिक्षकेतर प्रतिनिधी मनोज हिरणवाळे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. किर्ती मेढे, विद्यार्थी प्रतिनिधी चि.तेजस चव्हाण आदींसह सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, सेवक वृंद, विद्यार्थी–विद्यार्थीनी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री नन्नवरे यांनी दिली आहे

## गोव्यातील राष्ट्रीय स्त्री पुरुष वंध्यत्व परिषदेमध्ये डॉ. सौ. अंशु व डॉ. महेश मुळे यांचे व्याख्यान



**डॉ. सौ. अंशु मुळे**

नगर – आयुर्वेद व्यासपीठ ही आयुर्वेदिक पदवीधारकांसाठी राष्ट्रीयस्तरावर काम करणारी संघटना आहे. या संघटनेमार्फत आयुर्वेदामध्ये वेगवेगळ्या विषयांवर काम करणाऱ्या तज्ञांची व्याख्याने व नियमितपणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर परिसंवादाचे आयोजन केले जाते. १४ व १५ डिसेंबरला आयुर्वेद व्यासपीठ गोवा शाखेने स्त्री पुरुष वंध्यत्व या विषयावर दोन दिवसांचा परिसंवाद व कार्यशाळा आयोजित केली होती. यासाठी देशाच्या विविध राज्यातून अनेक तज्ञ डॉक्टर्स आलेले होते.

या कॉन्फरन्समध्ये डॉ.अंशु मुळे यांनी स्त्री वंध्यत्वातील अतिशय गुंतागुंतीच्या व क्लिष्ट केसेस मध्ये आयुर्वेदिक उपचाराने कसे रिझल्ट मिळतात याविषयी वेगवेगळ्या यशस्वी केसेस सादर केल्या. डॉ महेश मुळे यांनी पुरुष वंध्यत्वातील क्लिष्ट रुग्णांचे उपचारापूर्वीचे व उपचारानंतर यशस्वी झालेल्या रुग्णांचे रिपोर्ट्स व मुलाखती सादर केल्या.

स्त्री व पुरुष वंध्यत्वातील अतिशय महत्त्वपूर्ण पंचकर्मातील चिकित्सा म्हणजे स्त्री–पुरुष उत्तर बस्ती, विद्ध कर्म याचे मार्गदर्शन व प्रशिक्षण उपस्थित डॉक्टरांना त्यांनी दिले. हे उपचार आयुर्वेद तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली केल्यास वंध्यत्वासारख्या जटील समस्येमध्ये सुद्धा त्वरित फायदा होताना दिसून येतो. डॉ.सौ.अंशु मुळे व डॉ. महेश मुळे २५ वर्षांपासून श्री कमला आयुर्वेद हॉस्पिटलच्या माध्यमातून वंध्यत्व उपचार तज्ञ म्हणून अहमदनगर येथे काम करतात. आतापर्यंत त्यांनी आयुर्वेदातील संशोधित उपचार पद्धतीच्या माध्यमातून हजारो रुग्णांना अपत्यप्राप्तीचा लाभ मिळवून दिला आहे. त्यांच्या या हॉस्पिटलमध्ये आयुर्वेदातील सर्व पंचकर्म, उपकर्म, औषधी चिकित्सा शास्त्रीय पद्धतीने केली जाते.

## नगर येथील लेखिका शुभांगी माने–कऱ्हाडे यांच्या ‘स्ट्रेस फ्री, फिल फ्री ॲण्ड चेंज युवर लाईफ’चे प्रकाशन

### तणावमुक्तीने आनंदी जीवन जगण्यासाठी पुस्तक ठरतेयं मार्गदर्शक



नगर – प्रत्येकाचे जीवन तणावाने ग्रासलेले असताना तणावमुक्तीने आनंदी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाला मार्गदर्शक ठरण्यासाठी नगरच्या लेखिका शुभांगी माने–कऱ्हाडे यांनी स्ट्रेस फ्री, फिल फ्री, ॲण्ड चेंज युवर लाईफ हे पुस्तक लिहले आहे. दिल्ली येथील ड्रीम बुक पब्लिकेशन या संस्थेमधून पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले.

आपण एक वेगळे व्यक्ति आहोत. आणि आयुष्य हे आपल्याला इतरांपेक्षा काहीतरी वेगळ करण्यासाठी मिळालेली संधी आहे. आयुष्यात दुःख, अडचणी सगळ्यांनाच येतात. त्यातून आपल्याला जर कोणी बाहेर काढणारे असेल तर ते आपणच आहोत. याचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे स्ट्रेस फ्री, फिल फ्री, ॲण्ड चेंज युवर लाईफ हे पुस्तक आहे.

पहिली पायरी चढल्यावरच दुसरी पायरी येते. एका पायरीवरून आपल्याला लगेच शेवटच्या पायरीवर पोहचता येत नाही. म्हणजेच आपल्याला पहिल्या पायरी पासून सुरुवात करावी लागते.

हे पुस्तक लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांसाठी ऊर्जा स्त्रोत बनेल याच आशेतून हे पुस्तक लिहिले गेले असल्याची भावना लेखिका शुभांगी माने–कऱ्हाडे यांनी व्यक्त केली आहे.

केवळ देशातीलच नव्हे तर देशाबाहेरील लोकांना देखील हे पुस्तक वाचता यावं. विचारांची देवाण–घेवाण व्हावी याचा विचार करून हे पुस्तक लिहिण्यात आले आहे. आयुष्यात अनेक चढउतारातून गेल्यावर मला अस समजल की, ह्या टप्प्यामधून फक्त मी एकटी जात नाही तर, माझ्यासारखे बरेच जण आहेत. आणि माझ्याकडून स्ट्रेस फ्री, फिल फ्री, ॲण्ड चेंज युवर लाईफ नावाचं पुस्तकं लिहले गेले. हे पुस्तक ताण तणावातून बाहेर निघण्यासाठी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करत असल्याचे लेखिका माने–कऱ्हाडे यांनी म्हंटले आहे.

## २० ते २२ डिसेंबर दरम्यान पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बालरंगभूमी संमेलनात भिंगार छावणी परिषद शाळेच्या कलाकारांचा सहभाग

भिंगार – बालरंगभूमी परिषदेच्यावतीने २० ते २२ डिसेंबर दरम्यान पुण्यातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नाट्यगृह येथे पहिले राज्यस्तरीय बालरंगभूमी संमेलन होणार आहे. अभिनेते मोहन जोशी यांची संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. या संमेलनात अहिल्यानगर येथील पीएमश्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर छावनी परिषदेच्या शाळेचे बालकलाकार सहभागी होणार आहेत.

ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमाला मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, अजित भुरे, सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष विजय गोखले, सविता मालपेकर, सुबोध भावे उपस्थित राहणार आहेत. छावनी परिषद शाळेचे विद्यार्थी पारंपारिक प्रकारातील समूह व वैयक्तिक गीतांचे सादरीकरण करणार आहेत. या बालकलाकरांना स्नेहल लवांडे यांचे मार्गदर्शन तर आदित्य सुपेकर यांचे तबला व गीतांजली सगम हिचे हार्मोनियम साथ मिळनार आहे.

वरील सर्व बालकलाकारांचे छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्यालयीन अधिक्षिका स्नेहा पारनाईक, मुख्याध्यापक संजय शिंदे, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे यांनी अभिनंदन केले आहे.

## धनादेश न वटल्याच्या प्रकरणात आरोपीने रक्कम केली परत

नगर – फिर्यादी ॲड. बाळासाहेब पवार यांचे परिचित आरोपी गणपत मस्करे (रा.जुन्नर आळेफाटा जि.पुणे) हा सतत फिर्यादीकडे येत असत व त्या दरम्यान फिर्यादी व आरोपीची ओळख होवून फिर्यादीचा आरोपीने विश्वास संपादन केला. आरोपी यांस घरगुती अडचणीसाठी आर्थिक मदत भासली तेव्हा आरोपीने उसनवार म्हणून फिर्यादी यांच्याकडून रोख रक्कम उसनवार म्हणून घेतली. व रक्कम परत करण्याऐवजी आरोपीने त्याच्या बँकचा धनादेश दिला. सदरचा धनादेश न वटता परत आला म्हणून फिर्यादी यांनीनगर येथील जिल्हा न्यायालयात ॲड. सचिन देवा पाठक यांच्या मार्फत फिर्याद दाखल केली. केसमध्ये आरोपीस समन्सची बजावणी करून न्यायालयात हजर राहण्याचा आदेश मिळवला. सदर आदेशान्वये सदर केसमध्ये आरोपी हजर झाला. तसेच केसमध्ये आरोपीने फिर्यादीस सदरची उसनवार घेतलेली रक्कम अदा केली. सदर केसचा निकाल अवघ्या २ महिन्यातच लावण्यात ॲड. सचिन पाठक यांना यश आले व फिर्यादीस त्यांना त्यांची रक्कम मिळवून दिली. सदर केस नुकतीच पार पडलेल्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये निकाली काढण्यात आली. फिर्यादीतर्फे सुरूवातीला भरलेले स्टँम्पची रक्कम पैसे परत मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

## संस्कृती टिकविण्यासाठी विद्यार्थी दशेपासूनच चांगले संस्कार झाले पाहिजेत : जुबेर पठाण




शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशाला, श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित गणित–विज्ञान, हस्तकला व रांगोळी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मनपाचे शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण.

### शिशु संगोपन संस्थेत गणित–विज्ञान, हस्तकला व रांगोळी स्पर्धा

नगर – आज शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल होत आहे, या बदलांचा स्विकार करुन त्यापद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे. फक्त उपकरणे बनवून चालणार नाही तर त्याचा उपयोग, त्यातून समस्या कशी दूर होईल याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकी ज्ञानाबरोबरच जनरल नॉलेजचाही अभ्यास केला पाहिजे. मार्कांच्या मागे न लागता, नवनवीन शिक्षण घेतले पाहिजे. आज हस्तकला, रांगोळीच्या माध्यमातून आपली संस्कृतीचे दर्शन या ठिकाणी घडले आहे. आपली संस्कृती टिकविण्यासाठी विद्यार्थी दशेपासूनच संस्कार झाले पाहिजे. संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबवित असलेले उपक्रम कौतुकास्पद असेच आहे, असे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले.

शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशाला, श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित गणित–विज्ञान, हस्तकला व रांगोळी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मनपाचे शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, डॉ. राहुल झंवर, संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथ खोसे, सचिव र. धों. कासवा, सहसचिव राजेश झालानी, संजय चोपडा, सीमा गुंदेचा, रश्मी येवलेकर, बन्सी नन्नवरे, मनसुखलाल पिपाडा, एल. के. आव्हाड, सचिन डागा, विनोदकुमार कटारिया, कांचन गावडे, मुख्याध्यापिका (प्राथ.) योगिता गांधी, माध्यमिक मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे आदि उपस्थित होते.

डॉ. राहुल झंवर म्हणाले कि गणित–विज्ञान, हस्तकला, रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कला गुणांना चालना देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत सहभागी झाले पाहिजे त्याशिवाय आपल्याला अनुभव येत नाही. विविध क्षेत्रात सहभागी झाल्यामुळे आपली आकलन शक्ती वाढते यावेळी अतिशय सुंदर वेगवेगळे उपकरण विद्यार्थ्यानी सादर केले होते .

संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा म्हणाले, संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व भौतिक सुविधा देण्यात येत आहे. शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थीही विविध स्पर्धा, परिक्षांमध्ये चांगले यश संपादन करत आहेत. आज गणित–विज्ञान, हस्तकला, रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कला गुणांना चालना देण्यात येत आहे.

याप्रसंगी उपाध्यक्ष दशरथ खोसे म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगी काहीतरी वेगळे गुण असतात, त्याचा विकास अशा स्पर्धा, प्रदर्शनातून होत असतो. विद्यार्थ्यांनी बनविलेले उपकरणे, हस्तकला यामधून विद्यार्थ्यांनी चांगल्या कलाकृती सादर केल्या आहेत.

सहसचिव राजेश झालानी म्हणाले कि, गणित–विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभागी झाल्याने विद्यार्थ्याना आपणही काही तरी वेगळे उपकरण बनवुन शकतो याचा आत्मविश्वास वाढतो. टीम वर्कमुळे हे शक्य होऊ शकते असे ते म्हणाले.


विजयकुमार मुनोत म्हणाले कि, प्रत्येक क्षेत्र हे विविधता निर्माण करते अशा वेगवेगळ्या विविधतेमुळे त्या त्या क्षेत्रात काम करण्याची मोठी संधी मिळते गणित–विज्ञान, रांगोळी, हस्तकला, संगीत आदीमध्ये सहभागी झाल्याने आत्मविश्वास वाढत जातो. कोणतेही क्षेत्र हे कमी लेखून चालणार नाही तर ते एक ऊर्जा मिळवुन देत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक योगिता गांधी यांनी केले. सुत्रसंचालन वर्षा गोरे यांनी केले व दत्तात्रय कसबे यांनी आभार मानले.

# कॅलिडोस्कोप

## इवली तृष्णा

या इवल्या पाखराची तहान ती कितीशी! पण कोरडी पडलेली जीभ ओली करण्यापुरता थेंबही मिळाला नाही तर अशी कसरत करण्याशिवाय पर्याय उरत नाही. दुष्काळ माणसाच्या जीवनचक्राला खीळ घालतो पण काही मुक्या प्राण्यांचं जीवनचक्र थांबवतो हे विसरता कामा नये. लवकरच पाऊसकाळ सुरु होईल. तेव्हा आत्तापासूनच पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्याचा संकल्प सोडू या. हे साधलं तर उन्हाळ्यातही इवल्या चोचींची तृष्णा सहज भागू शकेल.





## नॉर्वेची हॉर्स वूमन

नॉर्वेतली एकमहिला घोड्याप्रमाणे धावते. त्यामुळे लोकांनी तिला हॉर्स वूमन असं नाव दिलं आहे. आयला कर्स्टन असं या महिलेचं नाव आहे. तिचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर होत आहेत. आयला घोड्याप्रमाणे धावत किंवा चालत नाही तर त्याच स्थितीत राहून कोणताही अडथळा पार करू शकते. आयलाने तीन आठवड्यांपूर्वी इंस्टाग्रामवर खातं उघडलं होतं. अवघ्या काही दिवसांमध्येच तिला खूप लोकप्रियता लाभली. लोक ट्विटरवरही तिची माहिती शेअर करत आहेत. चार वर्षांची असल्यापासूनच ती प्राण्यांप्रमाणे चार पायांवर चालते. लहानपणी ती कुत्र्याप्रमाणे चालत असे. अशा पद्धतीने चालताना आपल्याला कोणताही त्रास होत नसल्याचं आयलाचं म्हणणं आहे. आपल्याला कधीच दुखापत झाली नसल्याचं ती सांगते. आयलाने दोन व्हिडिओ शेअर केले आहेत. एकात ती कुत्र्यासोबत शर्यत लावत आहे तर दुसऱ्यात ती घोड्याप्रमाणे चालताना आणि धावताना दिसते. आयलाची ही करामत म्हणजे आश्चर्यच म्हटलं पाहिजे.

## जिलबीची जन्मकथा

आपण मिटक्या मारत जिलबी खातो. कढईतून नुकतीच बाहेर काढलेली गरमागरम जिलबी पाहून तोंडाला पाणी सुटतं. जिलबीच्या घमघमाटानेच ती खावीशी वाटते. अशी ही जिलबी सणा-समारंभाला खाल्ली जात असली तरी तिचं मूळ भारतात नाही. भारतासह पाकिस्तान, बांगलादेश, इराण आणि अरब देशांमध्ये हे मिष्टान्न खूप प्रसिद्ध आहे. परदेशातून भारतात आलेली जिलबी आता भारतीयच होऊन गेली आहे. प्रत्येक प्रांताने तिला आपलंसं केलं आहे. जिलब्या छोट्या किंवा मध्यम आकाराच्या असतात. पण इंदौरमध्ये ३०० ग्रॅम वजनाची जिलबीही मिळते. जिलबीसारखीच अजून एक मिठाई म्हणजे इमरती. इमरतीचा आकार, बनवण्याची पद्धत जिलबीसारखीच असते. चवीतही फार फरक नसतो. जिलबी ही अरबी मिठाई असल्याचं म्हटलं जातं. जलाबिया हे तिचं मूळ नाव. अल-तबीक या अरबी पुस्तकात या मिष्टान्नाचा उल्लेख आढळतो. इराणमध्ये जिलबीला जुलाबिया किंवा जुलुबिया म्हणतात. ५०० वर्षांपूर्वी तुर्की आक्रमकांनी जिलबी हा प्रकार भारतात आणला, असं काहींचं म्हणणं आहे. त्यानंतर जिलबीला भारतात लोकमान्यता मिळाली.



## परिस शोधण्यासाठी...

लोखंडाला परिसस्पर्श झाला की त्याचं सोनं होतं. अशा या परिसाच्या कहाण्या आपण कथा कादंबऱ्यांमधूनच वाचल्या आहेत. हा परिस प्रत्यक्षात अस्तित्वात असतो किंवा नाही, याबाबत काहीच सांगता येणार नाही. मात्र एका किल्ल्यात हा दगड असल्याचा दावा केला जातो. त्यामुळे दर वर्षी अनेक लोक इथे खोदकाम करून परिस शोधण्याचा प्रयत्न करतात. रायसेन किल्ल्यात परिस असल्याचं म्हटलं जातं. या दगडाच्या सुरक्षेसाठी यक्ष तैनात असून परिस कोणाच्याही हाती लागणार नाही याची काळजी तो घेतो. म्हणूनच परिसाचा शोध घ्यायला आलेल्या अनेकांना वेड लागल्याचं काहींचं म्हणणं आहे. या किल्ल्यात परिस असल्याबाबत पुरातत्त्व विभागाकडे कोणतीही माहिती नाही. मात्र भाबड्या आशेने लोक इथे येतात आणि खोदकाम करतात. या किल्ल्यात खरंच परिस आहे का, याबाबत तर्क लढवले जात आहेत.



## भारतातलं पाकिस्तान

पाकिस्तानचं नाव काढताच आपल्या मुठी आवळतात. या शत्रुराष्ट्राबद्दलचा राग पदोपदी व्यक्त होतो. मात्र भारतातही पाकिस्तान वसलाय, असं म्हटलं तर? याच नावाचं एक ठिकाण भारतात आहे. बिहारमधल्या पूर्णिया जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ३० किलोमीटर अंतरावर श्रीनगर प्रखंडाच्या सिंधिया पंचायतच्या हद्दीत एक गाव आहे. या गावाची लोकसंख्या १२०० आहे. इथे संथाल आदिवासी राहतात. हे लोक हिंदूधर्मिय आहेत. हा भाग मुख्य शहरापासून बराच लांब आहे. इथल्या लोकांना धड हिंदीही बोलता येत नाही. मोलमजुरी करून ते उपजीविका चालवतात. या गावात सरकारी सोयी-सुविधा पोहोचलेल्या नाहीत. इथे शाळा आणि रुग्णालयासारख्या प्राथमिक सोयीही नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र गावापासून १२ किलोमीटर अंतरावर आहे. या गावाचं नाव पाकिस्तान का पडलं हे कोणालाच माहीत नाही. मात्र पूर्वी पाकिस्तानमधून आलेले लोक इथे रहात असत. त्यानंतर त्यांना परत त्यांच्या देशात पाठवण्यात आलं. मात्र इथल्या लोकांनी आधीचंच नाव कायम ठेवलं, असं काहींचं म्हणणं आहे. नेमकं कारण मात्र कोणालाच सांगता येत नाही.




## अजब गजब शहर

शहर म्हटलं की ते विशिष्ट भूभागावर वसलेलं असतं. काही शहरं लहान असतात तर काही मोठी. मात्र एखादं शहर एका इमारतीत वसलं असेल तर? एकाच इमारतीत रुग्णालय, शाळा, प्रार्थनास्थळ, पोलीस स्थानकासारख्या सुविधा पहायला मिळाल्या तर? असं अजब गजब शहर बघून आपल्याला धक्काच बसेल. पण हे शहर प्रत्यक्षात अस्तित्वात आहे. अमेरिकेतल्या अलास्कामध्ये व्हिटियर नावाचा छोटासा तालुका आहे. आपल्या आगळ्या वेगळ्या रचनेमुळे ते जगभरात चर्चेचा विषय ठरलं आहे. हा संपूर्ण तालुका फक्त एका इमारतीत वसला आहे. या १४ मजली इमारतीचं नाव बेगिच टॉवर असं आहे. म्हणूनच याला व्हर्टिकल टाउन असंही म्हणतात. या एकमेव इमारतीत २०० कुटुंब रहातात. या कुटुंबांच्या गरजेची प्रत्येक गोष्ट या इमारतीत उपलब्ध आहे. त्यामुळे इथल्या लोकांना इमारतीबाहेर जावं लागत नाही. इथे चर्च आहे. पोलीस स्थानक, लाँड्री, रेस्टॉरंट, शाळा, दवाखाना, रुग्णालय असं सगळं या इमारतीत आहे. या इमारतीत कार्यालयंही आहेत. विशेष म्हणजे कार्यालयातले कर्मचारी आणि मालक याच इमारतीत रहातात. अमेरिका आणि रशिया यांच्यातल्या शीतयुद्धादरम्यान इथे सैन्याच्या रहाण्याची सोय करण्यात आली होती. मात्र नंतर इथे सर्वसामान्य लोक रहायला आले. या भागात बराच बर्फ पडत असतो. त्यामुळे इथल्या लोकांना फार लांब जाता येत नाही. रस्त्यावरून व्हर्टिकल टाऊनपर्यंत जाणं सोपं नाही. इथे जाण्यासाठी सरळ मार्गच नाही. इथे समुद्री मार्गाने जाता येतं.



## अंडरवेअर सहा हजार रुपयांना


सोशल मीडियावर सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टी चर्चेत असतात; पण सध्या ज्या वस्तूची चर्चा सुरू आहे, तिचे नाव ऐकून तुम्ही डोक्यालाच हात लावाल. सोशल मीडियावर एका अनोख्या अंडरवेअरची चर्चा सुरू आहे. काळ्या रंगाची ही अंडरवेअर चेन आणि काट्याची आहे. ही काटे असलेली ही अंडरवेअर अखेर घालेल तरी कोण, असा प्रश्न पडला असला, तरी तीच अंडरवेअर खरेदी करण्यासाठी लोकांची अक्षरश: झुंबड उडाली आहे. ही अंडरवेअर लाँच झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी ती विकली गेली.

ही अंडरवेअर एका खास हेतूने तयार करण्यात आली आहे. 'मेटल म्युझिक'ने आपल्या डाय हार्ड चाहत्यांसाठी 'पिट डायपर' नावाची एक अनोखी अंडरवेअर डिझाइन केली. ती घालून कोणत्याही व्यत्ययाशिवाय ती व्यक्ती त्यांच्या आवडत्या गाण्यांचा आनंद घेऊ शकतील. तिची किंमत ५९ पाऊंड म्हणजे सहा हजार ३३६ रुपये इतकी आहे. 'पिट डायपर' ही क्रुएल्टी फ्री लेदरपासून बनवलेली आहे. ती चेन आणि स्पाइकने सजवलेली आहे. ही अंडरवेअर फॅशन आणि फंक्शनचा यांचे एक परफेक्ट कॉम्बिनेशन आहे आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिला वासही येत नाही. ही अंडरवेअर 'लिक्विड डेथ' आणि 'डिपेंड' नावाच्या कंपनीने एकत्रितपणे तयार केली आहे. 'बाथरुम ब्रेकसाठी कोणताही शो थांबवता येणार नाही; पण पिट डायपर घातल्यावर मी कॉन्सर्टमधील कोणतेही गाणे मिस न करता स्वत:ला हायड्रेटेड ठेऊ शकतो' असे पिट डायपरचे प्रमोशन करताना मेटलचे म्युझिक ड्रमर बेन कोलर म्हणाले.



## या गावात एकही पक्के घर नाही!

आपल्या देशात अजूनही जुनी संस्कृती, परंपरा जपली जाते. अनेक जातसमूह, अनेक गावांनी या संस्कृतीचे जतन केले आहे. राजस्थानात तर पोषाखापासून ते ऐतिहासिक कि'्याचे जतन करून ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच पर्यटनासाठी राजस्थानला पर्यटकांची पसंती असते. उन्हाळ्यात या राज्यात प्रचंड ऊन असते, तर हिवाळ्यात जीवघेणा हिवाळा असतो; पण तरीही पर्यटक हिवाळ्यातच राजस्थानमध्ये फिरायला जाणे पसंत करतात. विदेशी पर्यटकही राजस्थानात राजे महाराजांचे कि" आणि राजवाडे पाहायला येतात.



राजस्थानमधील एक गाव तर प्रचंड सुंदर आहे. त्यामुळे या गावाला भेट दिल्याशिवाय पर्यटक पुढे जात नाही. राजस्थानच्या आमेर किल्ल्यापासून ते कुंभलगडापर्यंत अनेक महत्त्वाची ठिकाणे पाहण्यासाठी पर्यटक येत असतात. राजस्थानात असेही एक गाव आहे, जे आपली खासियत जपून आहे. या गावाला भारतातील सर्वश्रेष्ठ पर्यटक गाव म्हणूनही घोषित करण्यात आले आहे. राजस्थानला फिरायला गेला तर ब्यावर जिल्ह्यातील देवमाली गावाला जरूर जा. या गावातील प्रत्येक घर मातीचे आहे. घराचे छप्पर उडालेले आहे. गावात एकही पक्के घर नाही. प्राचीन काळातील घरांसारखी ही घरे आहेत. त्यामुळे या गावात गेल्यावर आपण जुन्या काळात तर नाही ना आलो असा भास होतो. या गावात फक्त मंदिर आणि सरकारी कार्यालये पक्की बांधलेली आहेत; पण घरे मात्र अजूनही कच्चीच आहेत. विशेष म्हणजे या गावात कोणीच मांसाहार करत नाही. सर्वच शाकाहारी आहेत. तसेच या गावात कोणीही दारू पित नाही. या गावात आजवर कधीच चोरी झाली नसल्याचे सांगितलं जाते. या गावातील तीन हजार एकर जमीन भगवान नारायणाला समर्पित आहे.

## मुस्लिम जोडप्याच्या लग्नपत्रिकेत हिंदू देव-देवतांची चित्रे

आजकाल आपण पाहतो, विविध प्रकारच्या लग्नपत्रिका असतात, ज्या व्हायरल होतात. अशीच एक लग्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाली. ही लग्नपत्रिका साधीसुधी नाही, तर एका मुस्लिम कुटुंबियांची ही पत्रिका आहे आणि तिच्यावर चक्क हिंदू देवी-देवतांचे फोटो आहेत. अनेकदा असे दिसून येते की, कोणत्याही शुभ कार्यात हिंदू कुटुंबातील लोक प्रथम गणेशाची पूजा करतात. त्याचप्रमाणे व्हायरल झालेल्या लग्नपत्रिकेवरही गणपतीचा फोटो आहे. मुस्लिम कुटुंबाच्या लग्नपत्रिकेवर गणपती आणि हिंदू देवी-देवतांचे फोटो पाहून लोक आश्चर्यचकित झाले आहेत. ही लग्नपत्रिका जवळपास सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाली आहे. सायमा बानो आणि इरफानचे ८ नोव्हेंबरला लग्न होते. लग्नाआधीही हे कार्ड खूप व्हायरल झाले होते आणि आता त्याची खूप चर्चा होत आहे. या लग्नपत्रिकेवर लोकांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत.

उत्तर प्रदेशातील अमेठी येथील एका मुस्लिम कुटुंबाची लग्नपत्रिका 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. लग्नपत्रिका पाहिल्यानंतर लोक आश्चर्य व्यक्त करत आहेत तर काही जण याचे कौतुक करत आहेत. ही लग्नपत्रिका व्हायरल झाल्यानंतर नेटकरी यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसत आहेत. एका 'सोशल मीडिया यूजर'ने लिहिले, की उत्तर प्रदेशातील अमेठी हे एकतेचे उदाहरण आहे. मुस्लिम कुटुंबाला मुलीच्या लग्नाची पत्रिका अगदी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे छापून मिळाली. लग्नाच्या पत्रिकेवर भगवान गणेश आणि राधा-कृष्णाचे चित्र पाहायला मिळाले. तसेच यावर एक संदेशही लिहिण्यात आला आहे, तो म्हणजे ''सभी वर्गों से प्यार,सभी सच्चे भारत वासी हैं।'' असा राष्ट्रीय एकात्मता दाखवणारा संदेश आहे. दुसऱ्या यूजरने लिहिले, की अशा लोकांबद्दल मला नेहमीच आदर वाटतो. यामुळे माझे हृदय भरून आले आहे.

एका 'सोशल मीडिया यूजर'ने लिहिले, की जर कोणी चांगले काम करत असेल तर त्याचे कौतुक करणे ही आपली जबाबदारी आहे. दुसऱ्याने लिहिले, की हिंदूंनीही असेच काम केले पाहिजे जेणेकरून दोन धर्मांमध्ये सलोखा राखता येईल.



## मशीन करेल माणसाची धुलाई!

प्रत्येकाच्या घरात वॉशिंग मशीन पाहिली असेल. ती कपडे धुण्यासाठी आणि सुकविण्यासाठी वापरली जाते. लोक सहसा त्यांच्या सोयीसाठी आणि वेळ वाचवण्यासाठी वॉशिंग मशीन खरेदी करतात. आजपर्यंत कपडे धुणे आणि भांडी धुण्याचे यंत्र याबद्दल ऐकले किंवा वाचले असेल; पण माणसाला धुवू शकणाऱ्या मशीनबद्दल तुम्ही कधी वाचले किंवा ऐकले आहे का? होय, जपानमध्ये असेच एक वॉशिंग मशीन आले आहे. त्यात कपडे किंवा भांडी नव्हे तर माणसे धुतली जात आहेत.

आजच्या वेगवान जगात लोकांकडे सहसा वेळ नसतो. स्वत:ला स्वच्छ करण्याचा एक जलद आणि सोपा मार्ग हे अनेक लोकांसाठी एक स्वप्न पूर्ण झाले आहे. आरामदायी शॉवर हा दिवसभरानंतर आराम करण्याचा पारंपारिक मार्ग आहे. जपानी अभियंत्यांनी एक नवीन संकल्पना आणली आहे, जी तुमची स्वच्छता आणि वैयक्तिक काळजी याबद्दल विचार करण्याची पद्धत बदलू शकते. हे ह्युमन वॉशिंग मशिनचे नवीन तंत्रज्ञान आहे जे एका जपानी अभियंत्याने तयार केले आहे आणि आता ते बाजारात धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाले आहे. हे पूर्णपणे एआय आधारित मशीन आहे. वॉशिंग मशिनमध्ये मानव पाऊल टाकताच, वापरकर्ता पारदर्शक प्लास्टिकच्या पॉडमध्ये बसतो. जो अर्धा गरम पाण्याने भरलेला असतो. हे पाणी हाय-स्पीड जेटस्मध्ये मिसळले जाते. जे लहान हवेचे फुगे सोडतात. हे बुडबुडे शरीराच्या संपर्कात आल्यावर फुटतात. लहान परंतु शक्तिशाली दाब लहरी तयार करतात. त्यामुळे त्वचेतील घाण आणि तेल काढून टाकण्यात मदत होते. ही प्रक्रिया पारंपारिक वॉशिंग तंत्रांपेक्षा वेगवान आहे.





वाल्मीक कराड यांच्यावरील खंडणीचा गुन्हा मागे घ्यावा, या मागणीचे निवेदन अहिल्यानगर येथील सर्व समाज बांधवांनी जिल्हाधिकारी यांना दिले. (छाया – विजय मते)

# वाल्मीक कराड यांच्यावरील खंडणीचा खोटा गुन्हा मागे घ्या

## अहिल्यानगर सर्व समाज बांधवांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर– जो माणूस समाजासाठी दिवस–रात्र आपला वेळ देतो. सर्व समाजातील लोकांसाठी काम करतो. त्या वाल्मीक कराड यांच्यावरच खंडणीचा खोटा गुन्हा दाखल करून त्यांची बदनामी करण्याचे षडयंत्र विरोधक करीत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी कराड यांच्यावरील खोटा खंडणीचा गुन्हा प्रकरणी लक्ष घालून न्याय द्यावा त्यांच्या वरील खोटा गुन्हा मागे घेतलाच पाहिजे अशी मागणी अहिल्यानगर येथील सर्व समाज बांधवांच्या वतीने तसेच मित्र मंडळाने जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदनाद्वारे केली आहे.

भीमराज आव्हाड यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन चर्चा केली. श्री. आव्हाड यांनी वस्तुस्थिती काय आहे हे सांगितले. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी मारेकऱ्यांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी याप्रकरणी कोणीही राजकारण करू नये या घटनेला जातीयवादी रंग देऊ नये. पोलिसांनी तपास करीत असताना निरपराध व्यक्तींना वेठीस न धरता या गुन्ह्यात अडकवू नये. अशी मागणी निवेदनात केली असल्याचे ते म्हणाले. याबाबत वरिष्ठांना तुमच्या भावना कळवू असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले.

निवेदनावर भीमराज आव्हाड, संतोष ढाकणे, राहुल सांगळे, भरत आव्हाड, पोपट सांगळे, प्रताप भिंगारदिवे, भास्कर पांडुळे, सोमनाथ गाडे, सरपंच अमोल शिंदे, सरपंच प्रकाश पालवे, राजू बुधवंत, संजय सानप, बंटी गर्जे, आनंद नाकाडे, युवराज आव्हाड, कुणाल भिंगारदिवे, बजरंग ससाणे, शुभम शिंदे, गणेश केकान, तेजस नागरगोजे, ओंकार चांदणे, शुभम देवकुळे, प्रताप बटुळे, सिद्धार्थ खेडकर, संतोष गर्जे, गणेश बांगर, किरण पाखरे, अक्षय जावळे, रवी पडधन आदींसह वाल्मीक अण्णा कराड मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंबेडकर स्मारक सामाजिक उपक्रमांसाठी तथागत बुद्धिस्ट सोसायटीला वापरास मिळावे



शहरातील आंबेडकर स्मारक सामाजिक उपक्रमांसाठी तथागत बुद्धिस्ट सोसायटीला वापरास मिळावे अशी मागणी समाजाच्यावतीने महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली.

नगर – शहराच्या टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तथागत बुद्धिस्ट सोसायटीला समाज उपयोगी उपक्रम राबवण्यासाठी वापरास मिळण्याची मागणी आंबेडकरी समाजाच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. समाजाच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन सध्या सुरु असलेल्या सामाजिक कार्याबद्दल माहिती देऊन सदर जागा सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी बाल भिक्खु संघ व भन्ते राहत असून, ते समाज उपयोगी काम करत आहे. तसेच शिक्षण देखील घेत आहे. महाराष्ट्रातील धम्म गुरु या स्मारकांमध्ये येतात व त्यांची या ठिकाणी व्यवस्था होते. धम्मकार्यासाठी शहरामध्ये कुठल्याही प्रकारची जागा नसून, सदर जागा समाज उपयोगासाठी वापरली जात आहे.

ही जागा वापरापूर्वी कित्येक दिवसापासून स्मारक बंद असल्याने अस्वच्छता पसरली होती. जेंव्हापासून ही जागा धम्माच्या कार्यासाठी वापरण्यास सुरुवात केली, तेंव्हापासून तेथे स्वच्छता राखली जाऊन येथील गैरप्रकार देखील थांबले आहेत. धम्माचे काम देखील या ठिकाणावरून व्यवस्थित चालते.

सदर न्यासाची नोंदणी झाल्यापासून विविध समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचा लाभ वंचित उपेक्षितांना मिळत आहे. बौद्ध धर्माच्या विकासासाठी प्रचार व प्रसारासाठी स्थापन केलेल्या न्यासाच्या अनुषंगाने गरीब कुटुंबातील दांपत्याचा विवाह लावणे, मोफत आरोग्य शिबिर, बौद्ध वधू वर सूचक मंडळ, बौद्धाचार्य तयार होण्यासाठी श्रामनेर शिबिराचे आयोजन केले जात आहे.

समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालय अभ्यासिका सुरू करण्यात न्यासाचा मानस आहे. सर्व उपक्रमाचा व्यापक स्वरूप प्राप्त होण्यासाठी न्यासाला जागेची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक गेल्या अनेक वर्षापासून मोकळ्या अवस्थेत असून, त्यात न्यासाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम सुरु आहे. या वास्तूचा विनियोग चांगल्या व योग्य उपक्रमासाठी होण्यासाठी तथागत बुद्धिस्ट सोसायटी या संस्थेला सदर जागा वापरण्यास देण्याची मागणी आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच या संदर्भात केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना देखील पत्र पाठविण्यात आले आहे.

# जेऊरच्या कत्तलखान्यावर छापा; १९ गोवंशीय जनावरांची सुटका

नगर – झेंडीगेट येथील कत्तलखान्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बायजाबाई जेऊर (ता. नगर) येथील कत्तलखान्यावर छापेमारी केली आहे. कारवाईदरम्यान ६ लाख २० हजार रूपये किंमतीच्या १९ गोवंशीय जनावरांची सुटका केली आहे. एकुण नऊ जणांविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुनाफ चाँद शेख, आयाज शब्बीर कुरेशी, फैयाज शब्बीर कुरेशी, समीर निसार कुरेशी (सर्व रा. कसाईवाडा, बायजाबाई जेऊर), नूर मोहमंद कुरेशी (रा. ममदापूर, ता. राहाता) व बाबु दाऊद कुरेशी (रा. चांदा, ता. नेवासा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांकडून कत्तलखान्यांवर छापेमारी केली जात आहे.

बायजाबाई जेऊर येथे इकलास मुनाफ शेख व इतर इसमांनी गोवंशीय जातीचे जिवंत जनावरे कत्तल करण्याचे उद्देशाने डांबुन ठेवलेले आहेत, अशी माहिती मिळताच पथकाने सदर ठिकाणी सोमवारी दुपारी कारवाई केली.

# इंडिगेट परिसरात गोवंश जनावरांचे कातडे पकडले

नगर – बेकायदेशीर रित्या गोवंश जनावरांची कत्तल करून त्यांचे कातडे बाळगणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले.त्याच्या कडून दोन हजार रुपये किमतीचे गोवंश जनावरांचे कातडे जप्त केले ही कारवाई कोतवाली पोलिसांनी झेंडीगेट परिसरातील कुरेशी मोहल्ला येथील कुरेशी मशीद जवळ केली.

याबाबतची माहिती अशी की कोतवाली पोलीस झेंडिगेट परिसरात पेट्रोलिंग गस्त करीत असताना कुरेशी मोहल्ला येशील कुरेशी मज्जिद जवळ एक इसम गोवंश जनावरांचे कातडे बाळगून असल्याचे माहिती पोलिसांना मिळाली त्या माहितीवरून पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता या कारवाईत पोलिसांनी तौसीफ सादिक कुरेशी यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन हजार रुपये किमतीचे, त्यास गोवंश जनावरांचे त्यास कान असलेले कातडे मिळून आले पोलिसांनी ते जप्त करून तौसीफ कुरेशी यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुरज कदम यांनी दिलेले फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्यायालय २०२४ चे कलम २७१ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (सी) ९९ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार संदीप पितळे करीत आहे. ही कारवाई कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संदीप पितळे, विशाल दळवी, अभय कदम, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे, अनुप झाडबुके, सतीश शिंदे यांच्या पथकाने केली.

# गोवंश जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – महाराष्ट्र शासनाची वंश जनावरांची हत्या करण्यास व वाहतूक करण्यास मनाई असताना विनापरवाना बेकायदेशीर रित्या गोवंश जनावरे टेम्पो भरून त्यांना चारा पाणी विना ठेवून त्यांची वाहतूक करणारा टेम्पो नगर तालुका पोलिसांनी पकडला. या कारवाईत दोन लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई केडगाव बायपास ते कल्याण बायपास मधील नवीन झालेल्या टोलनाक्या समोर केली.

याबाबतची माहिती अशी की केडगाव बायपास ते कल्याण बायपास रोडने गोवंश जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणारा टेम्पो जात असल्याची नगर तालुका पोलिसांना माहिती मिळाली या माहितीवरून नगर तालुका पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन टाटा कंपनीचा छोटा हत्ती टेम्पो (क्रमांक एम एच १७ डी डी ०७२५) यास पकडले. पोलिसांनी टेम्पो ची पाहणी केली असता त्यामध्ये, बैल व म्हैस असे गोवंश जनावरे आढळून आले. पोलिसांनी छोटा हत्ती टेम्पो सह सुमारे अडीच लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करून टेम्पो चालक अजय रामदास फुलमाळी (वय २८) व रामदास सखाराम फुलमाळी (वय ६० दोघे राहणार ब्राह्मणी तालुका राहुरी) यांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी किरण आजिनाथ जगताप (वय २७ राहणार सिद्धार्थनगर अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ) ५ (ब) ९ सह प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणे बाबत अधिनियम १९६० चे कलम ११ (१) (ड) प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली असून तपास महिला पोलीस हवालदार रेपाळे या करीत आहे.

# काटवन खंडोबा रोडवर नायलॉन मांजा पकडला

## कोतवाली पोलिसांची कारवाई

नगर – महाराष्ट्र शासनाने काढलेल्या निर्देशाची अवज्ञा करुन अनाधिकृत रित्या, शासनाने बंदी केलेल्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी पकडून त्याच्याकडून ३१ हजार ५०० रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला. ही कारवाई काटवन खंडोबा रोडवर, सप्तपदी मंगल कार्यालयाजवळ १७ डिसेंबर रोजी सायंकाळी केली.

कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की, सप्तपदी मंगल कार्यालयाजवळ काटवन खंडोबा रोडवर पांढऱ्या रंगाचे गोणीमध्ये एक इसम बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. पोलिसांनी तत्काळ सप्तपदी मंगल कार्यालयाजवळ जाऊन पाहणी केली तेथे एक इसम पांढऱ्या रंगाचे गोणी मध्ये बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करीत असताना मिळून आला. पोलिसांनी छापा टाकून त्या इसमास पकडुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने मिनीनाथ बळीराम बिज्ञा (वय ३१ वर्षे, रा. लोंढे वस्ती, कल्याणरोड, अ.नगर) असे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ ३१ हजार ५०० रुपये किमतीचा प्लॅस्टीक किंवा कृत्रीम पक्क्या धाग्याने बनविलेल्या मोनोकेटीसी ४५ नायलॉन मांजाचे बंडल मिळून आल्याने तो मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सतीष शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिनीनाथ बिज्ञा याच्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २२३.१२५ सह.पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५, १५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली.

ही कारवाई महिला सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे, पोलीस हवालदार योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, पोलिस कॉन्स्टेबल अमोल गाडे, अभय कदम, राम हंडाळ, यांनी केली.

# नित्यसेवा येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई

नगर – महाराष्ट्र शासनाचा नायलॉन मांजा विक्री करण्यास मनाई आदेश असताना नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एकावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी ५५००० चा मांजा जप्त केला. ही कारवाई पाईपलाईन रोडवरील नित्यसेवा येथील दत्त मंदिरासमोर केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक शहराम ध्ये अवैध चायना मांजावर कारवाई करणेसाठी पेट्रोलिंग करीत असताना माहिती मिळाली की, शहरातील पाईपलाईन रोड, नित्यसेवा येथील नित्यसेवा दत्त मंदीर समोर आडोश्याला ओंकार नरेश मुदगंटी हा नायलॉन चायना मांजाची विक्री करीत आहे. पोलिसांनी खात्री करून त्या ठिकाणी अचानक छापा टाकून नायलॉन मांजाची विक्री करत असलेल्या इसमास ताब्यात घेतले. ओंकार नरेश मुदगंटी (वय २६ वर्षे रा. नित्यसेवा सोसायटी, नगर) याच्या ताब्यातून ५५ हजार मोनो के टी सी फायटर कंपनीचे नायलॉन चायना मांजाचे ५५ नग जप्त केले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रविंद्र घुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओंकार मुदगंटी याचे विरुध्द बी.एन.एस कायदा कलम २२३,१२५ सह पर्यावरण संरक्षण अधि १९८६ चे कलम ५,१५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. ही कारवाई पोलीस हवालदार संदीप पवार, पोलिस कॉन्स्टेबल मयुर गायकवाड पोलिस कॉन्स्टेबल विजय ठोंबरे, चालक पोलिस हवालदार महादेव भांड यांनी केली.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या संयुक्त मुख्य प्रशासिका राजयोगिनी संतोष दीदी यांना ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंड कडून ऑनर सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या पुण्यातील धनकवडी सेवाकेंद्रामध्ये झालेल्या कार्यक्रमात ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंडच्या ब्रांड ॲम्बेसडर अभिनेत्री डॉ. ईशा अगरवाल व रयत शिक्षण संस्था साताराचे चेअरमन निवृत्त सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संतोष दीदी ना सन्मानित करण्यात आले. यावेळी मीरा सोसायटी पुणे येथील सब ज़ोन इंचार्ज सुनंदा दीदी, धनकवडी सेवाकेंद्र प्रभारी सुलभा दीदी तसेच ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंड चे व्हाइस प्रेसिडेंट बी के डॉ. दीपक हरके.



विमा धारकांना मिळणाऱ्या बोनसमध्ये वाढ करण्यात यावी अशा मागणीसाठी ऑल इंडिया लि. (आफी) संघटनेच्या पुणे विभाग १ आणि पुणे विभाग २ तर्फे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

# विमा धारकांना मिळणाऱ्या बोनसमध्ये वाढ करण्यात यावी

नगर – गेली अनेक वर्षे एलआयसी ला व्यवस्थित नफा होऊन सुद्धा विमेदारांच्या बोनसमध्ये वाढ केलेली नसुन त्यामध्ये भरीव वाढ करणे गरजेचे आहे अशी आग्रही मागणी विमा प्रतिनिधी संघटने मार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे सेक्रेटरी प्रमोदकुमार छाजेड व रमेश कांबळे यांनी दिली आहे.

विमा हा कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षे साठी घेतला जात असल्यामुळे आणि भारतासारख्या खंडप्राय देशात अजून हि ७०% विमायोग्य लोक विमा योजने पासुन वंचीत असल्यामुळे जी एस टी ची आकारणी करु नये अशी मागणीही केंद्र सरकार कडे संघटने मार्फत करण्यात आली आहे तसेच विमाप्रतीधिनीना सर्व विमा कंपनीचे विमा प्रॉडक्ट विकण्याची परवानगी मिळावी यासाठी संसदेमध्ये विमा कायदा दुरूस्ती संदर्भात जे बिल चर्चेसाठी आले आहे त्याचे समर्थन विमा प्रतिनीधी संघटना करीत आहे.

तसेच सर्व विमाप्रतीनिधीना पेन्शन मिळण्यासाठी आणि उन वारा आणि पाऊस याची पर्वा न करता अविरत कष्ट करून सर्व समाजात विमा प्रसार करून समाजातील कुटुंबांना आर्थिक सुरक्षा एलआयसी मार्फत प्रदान करणाऱ्या सर्व विमाप्रतीनिधी व त्यांचे कुटुंबीय यासाठी ग्रुप मेडीक्लेम सुविधा आणि ग्रुप इन्शुरन्स पंचवीस लाख करण्यात यावा यासाठी भरावा लागणार विमा हप्ता देण्याची तयारी विमा प्रतिनिधींची असताना सुद्धा आजपर्यंत कोणताही निर्णय एलआयसी व्यवस्थापनाने न घेतल्या बद्दल तसेच १ ऑक्टोबर नंतर एलआयसी कडून काही नव्या विमा योज ज्या जाहीर करण्यात आल्या आहेत त्यामध्ये विमा प्रतींनीधीना मिळणाऱ्या प्रथम वर्षीय कमीशनमध्ये कपात आणि कोणत्याही कारणाने विमेदाराने घेतलेली विमा पॉलिसी सरेंडर केली तर विमाप्रतीनिधीला मिळालेले सर्व कमीशन वसूल करण्या साठी नव्याने बनवलेला क्ला बॅक हा काळा कायदा रद्द करण्या साठी एलआयसी विभागीय कार्यालयासमोर १७ डिसेंबर रोजी ऑल इंडिया लि. (आफी) संघटनेच्या पुणे विभाग १ आणि पुणे विभाग २ तर्फे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी ऑल इंडिया लाईफ इन्शुरन्स एजंटस फेडरेशनच्या पश्चीम क्षेत्रीय विमाप्रतीनिधी संघटनेचे अध्यक्ष सुधीर पाध्ये, संघटनेच्या पुणे १ विभागाचे सचिव प्रमोद कुमार छाजेड, पुणे विभाग २ चे सेक्रेटरी रमेश कांबळे, पुणे १चे उपाध्यक्ष दिलिप मुंदडा, पुणे २ संघटक सचिव संजय नवघणे यांच्या सहित विविध शाखांचे अध्यक्ष आणि पुणे शहर, पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्ह्यातून विमाप्रतिनिधी उपस्थित होते.

# तूर व कांदा विक्री व्यवहारात २ शेतकऱ्यांची फसवणूक

## एकाला ८ लाखांलातर दुसऱ्याला सव्वा दोन लाखाला गंडा

नगर – परजिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी नगर तालुक्यातील २ शेतकऱ्यांची तूर व कांदा खरेदी विक्री व्यवहारात सुमारे सव्वा दहा लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात मंगळवारी (दि.१७) दुपारी वेगवेगळे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत मेहेकरी येथील शेतकरी महेश अर्जुन पालवे (वय ३०) याने फिर्याद दिली आहे. या शेतकऱ्याने आपल्या शेतात तूर लावली होती. त्याला एका व्यापाऱ्याने मोठ्या प्रमाणावर तूर देण्याची मागणी केली. त्यामुळे त्याने आपल्या शेतात उत्पादित तूर सोबत लातूर जिल्ह्यातील बाभळगाव येथील व्यापारी संजय शिवलिंग स्वामी याच्याशी संपर्क साधत तूर देण्याची मागणी केली. व्यापारी स्वामी याने त्यास तूर पुरवठा करण्याचे आश्वासन देत पैशांची मागणी केली. त्यानुसार फिर्यादी पालवे याने त्यास चेक, आरटीजीएस, फोन पे द्वारे तब्बल ८ लाख १० हजार रुपये पाठविले. त्यानंतर त्यास वारंवार संपर्क साधूनही त्याने तूर पुरवठा केला नाही. बरेच दिवस पाठपुरावा करूनही तूर न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी पालवे यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याने मंगळवारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी व्यापारी संजय स्वामी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी फिर्याद आठवड येथील शेतकरी गोपाळ किसन मोरे (वय ५०) यांनी दिली आहे. त्यांनी २ वर्षापूर्वी आपल्या शेतात कांदा लागवड केली होती. कांदा काढणी झाल्यावर त्यांच्या गावातील गणेश उर्फ दशरथ महादेव गुंजाळ याने त्यांना एका व्यापाऱ्याचे नाव सांगून सदर व्यापारी तुमच्या बांधावर येवून चांगल्या भावात कांदाखरेदी करून घेवून जाईल असे सांगितले. गुंजाळ हा गावातील असल्याने फिर्यादी मोरे यांचा त्याच्यावर विश्वास बसला व त्यांनी आष्टी तालुक्यातील आंबेवाडी येथील व्यापारी सागर उत्तम शिंदे यांना २ लाख २९ हजार १७१ रुपये किंमतीचा ४२४ गोण्या कांदा दिला. त्यानंतर पैशांची मागणी केली असता सदर व्यापारी सागर शिंदे याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अनेकदा पाठपुरावा करूनही पैसे न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी मोरे यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी मंगळवारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गणेश उर्फ दशरथ महादेव गुंजाळ व व्यापारी सागर उत्तम शिंदे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगर-दौंड या मार्गावरील आनंद पेट्रोलपंप ते कायनेटीक कंपनी पर्यंत वाहतूक मार्गात बदल

नगर – नगर – दौंड मार्गावरील आनंद पेट्रोल पंप ते कायनेटीक कंपनी या रोडवरील जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करुन ३१ डिसेंबरपर्यंत रात्री आठ वाजेपर्यंत या वाहतुक मार्गात बदल केला, अशी माहिती वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे यांनी दिली.

या कालावधीत नगर ते दौंड कडे जाणारे रस्त्यावर व्हीआरडीई ला पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याने क्रिएशन इंजिनीअर्स आणि मिलिटरी इंजिनीअर सर्व्हिस यांच्या संयुक्त विद्यमाने जलवाहिनी दुरुस्तीचे काम १८ डिसेंबर रोजी सुरु झाले आहे. दुरुस्तीच्या कामावेळी रस्त्याचे खोदकाम केले जाणार असल्याने अपघात होऊन नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका पोहोचून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, या करीता मार्गावरील वाहतुक मार्गात खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

कायनेटीक चौक ते दौड रोडने अरणगाव बायपासकडे जाणाऱ्या वाहनांकरीता पर्यायी मार्ग – आनंद पेट्रोल पंप, कायनेटीक कंपनी मेन गेट पर्यंत, नगर ते दौड रोडच्या उजव्या बाजूने ऐकेरी मार्गे, अरणगाव बायपास व इच्छित स्थळी जातील.

या आदेशाचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

